श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## .मासिक.

वर्ष १७ ] शके १८६२ कार्तिक. [ अंक ८

बाबा बाबा, निशिदिनिं मना बोल हे गोड बाबा ।
बाबा नामीं, किलितरी असे हिंव जाउं अगाना ॥



बा बाळिहुं, त्यज शरण जा त्या न भूपा नवाबा ॥
बा बाबा ना, तुज यमगृहीं जावयाची उबाबा ॥

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

संपादकः–रामचंद्र वासुदेव घैसास

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| श्री. माधवरावांचे ( शामा ) अल्प चरित्र | [illegible] |
| श्री साईसमर्थनाथ [illegible] ... ... ... ... | ३१० |
| बांद्रे येथील उत्सव ... ... ... ... | ३११ |
| विनयविनंती ... ... ... ... | ३१२ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... | ३१३ |
| अनुभव ... ... ... ... | [illegible] |


## श्रीसाईभक्तांस विनंती

साईलीलेचें वर्ष चैत्र महिन्यापासून सुरू होतें. तरी अंक सुरू करणें झाल्यास चैत्रापासून वर्गणीदार झालें पाहिजे.

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनी आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चरई रोड, ठाणे यांस कळवावें.

भक्तांनी आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनीं चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठऊन द्यावी. अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.


**रा. वा. घैसास, संपादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २

गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई १४.




वेंकटेश समाधी आणि वेंकुसा मंदीर, सेलु



वेंकुसा समाधी—सेलु



श्रीमती पी. सुंद्रामा ( म्यु. कौंसीलर ) बाबांची
पुण्यतिथीच्या दिवशीं पूजा करत असतांना



नानासाहेब डेंगळे यांच्या घराची पुढची भींत ( निमगांव )
बाबा नेहमी बसत



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥



श्रीसाईनाथ

# श्री. माधवराव बळवंत [बाबांचा शाम्या] देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

———:o:———

श्री दत्तचित्साइसद्गुरुभ्यानमः

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तम् ॥
हे कृष्ण हे यादव हे सखेति ॥
अजानता महिमानं तवेदम् ॥
मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ४१ ॥

श्री. भ. गी. अ. ११


या जगातितलावर विखुरलेल्या थेट लोकमान्यादि राष्ट्रकार्य धुरंधर चिद्रत्न शिरोमणीपासून तो रस्त्यावर भीक मागणाऱ्या वेडसर मानलेल्या वृद्ध म्हाळसादेवी ( म्हाळी ) पर्यंत बाबांच्या असंख्य भक्तवृंदांत श्री. माधवराव देशपांडे यांचे नांव कोणास माहीत

नाहीं असा भक्त विरळा, अशा माधवराव बळवंत देशपांडे यांचें अल्प चरित्र आज येथे देण्याचें योजिलें आहे.

माधवरावांच्या चरित्राचें निरीक्षण साधारण भक्तांच्या चरित्राप्रमाणें करण्याचें नसून अगदी निराळ्या व सूक्ष्मदृष्टीनें केलें पाहिजे असें मला वाटतें.

माधवरावांचा व माझा सहवास व परिचय थोड्याफार प्रमाणानें आज ३० वर्षें होता व तोही निकट संबंधाचा होता. कारण शिरडीस गेलों म्हणजे मी त्यांचे शेजारी काकासाहेब दिक्षितांचे वाड्यांत ८ दिवस, १५ दिवस, महिना व दोनमहिने राहत असे.

मी जें आज येथें माधवरावांचें अल्प चरित्र देण्याचें योजिलें आहे त्यांतील बहुतेक सर्व भाग मी माधवरावांचे मुखातूनच घेतला आहे व तो मला सांगण्यास त्यांनीं दिनांक २-४--३४ रोजीं श्री बाबांचे पादुकावर चिठ्या टाकून बाबांची परवानगी घेतली होती. असल चिठ्ठी त्यांचे हातची मोडींत लिहिलेली सोबत जोडली आहे.



( चिठ्ठीचा नमुना )

## जन्म, जन्मस्थान

माधवरावांचा जन्म यजुर्वेदी देशस्थ ब्राम्हण कुळांत शके १७८२ मार्गशीर्ष शु. ५ या दिवशीं नगर जिल्ह्यांत संगमनेर तालुक्यांत शिरडीपासून पश्चिमेस २० मैलांवर निमोण गांवीं झाला.

## माधवरावांचें बालपण

माधवरावांच्या मातुःश्री ह्या त्यांच्या वडिलांचें चवथें कुटुंब. पहिले तिन्ही कुटुंबांना संतति झाली नाहीं. म्हणून शिरडीनिवासी श्री. लक्ष्मणमामा कुलकर्णी यांच्या भगिनी ह्या त्यांनीं चवथें कुटुंब केले. माधवराव हें त्यांचें पहिलेंच अपत्य. माधवराव जन्मल्यावर तिसरेच वर्षी माधवरावांचे वडील सहकुटुंब सहपरिवार निमोणहून शिरडीस रहावयास आले.

## शिक्षण

माधवरावांचें शिक्षण शिरडीसच झाले. ते मराठी ५-६ इयत्ता शिकले होते. त्यांना संस्कृताचा किंवा इंग्रजीचा गंध नव्हता.

## वाणी

माधवरावांचे वाणीस संस्कृताचा किंवा उच्च मराठी शिक्षणाचा संस्कार बिलकुल नसल्यामुळे व त्यांचें सर्व आयुष्य शिरडी सारख्या खेडेगावांत देसोरी अशुद्ध बोलणाऱ्या मंडळींच्या सहवासांत गेले असल्यामुळें त्यांच्या बोलण्यांत येनी, फनी, पानी,लोनी,येडा, इत्तु, इठुलयेनु, बोल्स्यात, चालस्यात, वगैरे वगैरे अशुद्ध शब्दप्रयोग नेहमींच ऐकूं येत. त्यांची घरीं दारीं सर्व भाषा अशाच प्रकारची असे.

## स्थावर मिळकत व वतन

शिरडींत त्यांच्या मालकीचें लहानसें खेडेगांवी थाटाचे घर आहे. निमोण शिरडी वगैरे ठिकाणीं त्यांचीं जमीन आहे.हे निमोणचे देशपांडे,देशपांडे हक्काची रोकड रक्कम संगमनेर, कापरगांव व सिन्नर तालुक्यांतून त्यांना मिळते. पहिले माधवरावांस दोन धाकटे बंधु होते एक काशिनाथ बळवंत दुसरे बापाजी बळवंत. काशिनाथ हे दत्तक दिले होते: त्यांचे तिकडील नांव गणेश श्रीधर. हे सर्व बंधू विभक्त असून दोघाचा परिवार शिरडीस असून तिसऱ्यांचा परिवार इतरत्र आहे.

## संतति

माधवरावांची दोन लग्नें झाली. पहिल्या कुटुंबाचें नांव सौ. सावित्रीबाई. त्यांना एकच अपत्य झाले. त्याचें नांव श्री. एकनाथपंत त्यांचें लग्न झालें असून त्यांना बरींच मुलेंबाळें आहेत. ते प. व. खात्यांत नोकर आहेत, त्यांचें कुटुंब श्री. सौ. उमाबाई निमगांव निमोंजचे गोपाळ कचेश्वर कुळकर्णी यांच्या कन्या.

माधवरावांच्या दुसरें कुटुंबाचें नांव सौ. द्वारकाबाई. त्यांना श्री. जगन्नाथपंत व उद्धवराव असे दोन मुलगे व एक कन्या सौ. बबीताई अशीं तीन अपत्यें आहेत. जग-

जगन्नाथपंत व बबीताई यांची लग्नें झाली असून त्यांना मुलेंबाळेंहि झाली आहेत. बबीताईचें सासर नगर जिल्ह्यांत पारनर गांवीं श्रीनारायण नागेश वांदे यांचेकडे आहे. जगन्नाथपंतांचें कुटुंब सौ. राधाबाई ह्या नाशीकनिवासी श्री. हरीपंत कुळकर्णी जाखुरीकर यांच्या कन्या. माधवरावांचीं हीं चारी अपत्यें सहकुटुंब सहपरिवार हयात आहेत.

## शरीरप्रकृति

माधवरावांचें शरीर धिप्पाड, काठी उंच व मजबूत, वर्ण निमगोरा, प्रकृति निकोप, व निरोगी असून त्यांचा आहार चांगला असे. त्यांचे वयाचे ७२ वर्षापर्यंत त्यांना कधींहि ताप आला नाहीं किंवा त्यांचें डोकें दुखलें नाहीं.

## धर्म आचार व आहार

माधवराव पूर्ण सनातनी धर्माचे असून खाण्यापिण्यासंबंधीं त्यांचें आचरण अति शुद्ध व नियमबद्ध असे. कांहीं घराशिवाय परके ठिकाणीं माधवराव कोणाकडे कधीं जेवत नसत, ते स्वतः हातीं करून खात, त्यांना उत्तम स्वयंपाक करता येत असे, त्यांची भूक नेहमीं खरमरीत असून अग्नि प्रदीप्त असे, त्यांना हिंदु धर्माचा फार अभिमान असे.

## उदर निर्वाहाचा व्यवसाय नोकरी व वैद्यकी

माधवराव लहानपणीं कांहीं वर्षें शिरडी गांवांतील शाळेंत दुय्यम किंवा मदतगार ( असिस्टंट मास्तर ) शिक्षकाचें काम करीत असत, नंतर कांहीं वर्षें बाबांच्या परवानगीनें त्यानीं शिरडीपासून ३–४ मैलाचे अंतरावर असलेल्या अस्तगांव नांवाच्या गांवची पाटिलकी मोठ्या थाटानें केली, नंतर मरेपर्यंत वैद्यकी केली. ते नेहमीं बाबांचें नांव घेऊन औषध देत व औषधांत बाबांची उदी घालीत, बाबांच्या कृपेनें त्यांचें हातांस नेहमीं यश येई. त्यांना नाडी परीक्षा चांगली असे, मोठमोठ्या नामांकित डाक्टर वैद्यांनी हात टेंकलेले रोगी ते बाबांचें नांव घेऊन बरे करीत. त्यांना रोगाची व औषधाची माहिती चांगली असे, ते कोणाजवळ वैद्यशास्त्र शिकले नव्हते, पण आर्य वैद्यकाचीं कांहीं पुस्तकें वाचून व बाबांचें मुखांतून आलेलीं नानाप्रकारच्या रोगावरील औषधें लक्षांत ठेवून ते वैद्यकीचा धंदा करीत. पनवेल पुराणिकांच्या कारखान्यांतील व चेंबूर निवासी सांडू बंधूंच्या कारखान्यांतील औषधें ते वापरीत व कांहीं ते स्वतः तयार करीत.

माधवराव मदत शिक्षकाचें काम करीत असल्यावेळीं त्यांचा वर्ग शिरडी गांवांत श्रीद्वारकामाई ( मशीद ) समोर श्री गुंड सर्कल इन्स्पेक्टर यांनीं बांधलेल्या, कांहीं दिवस श्री राधाकृष्ण आई रहात असलेल्या, शेवटीं शेवटीं बाबांच्या श्री श्यामसुंदर वारूचें निवासस्थान बनलेल्या लहानशा घरांत असे. त्या वेळीं हें घर हल्लीप्रमाणें दगडी

नसुन विटा मातीचेंच होतें. श्री द्वारकामाईस लागून असलेल्या भिंतीस एक खिडकी असे व तेथेंच माधवरावांचे बसण्याची जागा असे. तेथुन श्री द्वारकामाईंत बसलेल्या बाबांचें सर्व व्यवसाय त्यांना दिसत असत.

## माधवरावांना बाबांची सत्संगति व अतिदीर्घ सहवास.

माधवराव शिक्षकाचें काम करूं लागले तेव्हां त्यांचे वय अजमासे १४-१५ वर्षांचें असेल. बाबा शिरडीस आले. ते माधवरावांचे देखतच आले त्यावेळीं माधवराव बाबांना एक धुनी लावून मशीदींत बसणारा व नेहमी चिल्मि फुंकणारा वेडसर अल्पवयी १९-२० वर्षांचे दयाचा फकीर आहे इतकेंच मानीत असत. बाबा हे सिद्ध आहेत, संत आहेत, सगुण परमात्मा आहेत ही भावना त्यांचेजवळ मुळींच नव्हती. माधवराव बाबा-मशिदींत आल्यापासून लवकरच दिवसांतून बरेचवेळा बाबांकडे फक्त चिल्मि ओढण्या-करतां म्हणून जात.

माधवरावांची पहिलीं १०-१२ वर्षें बाबासंबंधीं अशाच भावनेंत गेलीं. पुढील १०-१२ वर्षें बाबा सत्पुरुष आहेत,संत आहेत अशा भावनेंत गेली. व बाबांचा जसजसा निकट व नित्य सहवास होऊं लागला व स्वतः त्यांच्या सिद्धत्वाचे प्रत्यक्ष अनुभव येऊं लागले व इतर नानासाहेब चांदोरकरादि भक्तगणांचे हजारो मूर्तिमंत अनुभव नित्य कळूं लागले तेव्हां त्यांची पुढील २०-२२ वर्षें बाबा हे सिद्ध पुरुष असून मूर्तिमंत सगुण परमात्मा आहेत अशा दृढ भावनेंत व बाबांच्या आज्ञाधारकपणांत व भक्तवृंदाच्या-शुश्रु-षेंत गेलीं. याप्रमाणें माधवरावांची सुमारें ४२-४३ वर्षें अव्याहतपणें सतत बाबांच्या निकट सहवासांत गेलीं. माधवरावांनीं बाबांना प्रथम पाहिले ते मशीदींत ( द्वारका-माईंत ) पाहिलें.

यानंतर बाबांच्या समाधीकालापासून माधवरावांच्या अंतकालपर्यंतची माधव-रावांची अलीकडील २३ वर्षें वैद्यकीचा धंदा करण्यांत, भक्तगणांचा परामर्ष घेण्यांत व बाबांचें नामस्मरण करण्यांत, व बाबांच्या लीला जिज्ञासु सर्व अबालवृद्धांस सांगण्यांत गेलीं. माधवरावांइतका बाबांचा निकट सहवास शिरडींतील श्री तात्या पाटील कोते खेरीज करून इतरास क्वचितच लाभला असेल.

बाबा माधवरावांना पहिल्यापासुन “ श्याम्या ” म्हणून संबोधित, बाबा पुष्कळ भक्तांना निरनिराळ्या टोपण नांवांनीं हांक मारीत. व तीं सर्व नांवें अन्वर्थक असत, त्याचप्रमाणें “ श्याम ” हें नांवहि अत्यंत अर्थपूर्ण आहे व त्यांत अत्यंत प्रेम व एकप्रका-रची जादु भरलेली आहे असें मला वाटतें.

वास्तविक श्याम हा शब्द संस्कृत असून तो विशेषण वाचि आहे. त्याचा अर्थ काळा, पण कोळशासारखा काळा कुळकुळीत, किंवा काजळासारखा काळाकुट्ट, किंवा कावळ्यासारखा करारी काळा नव्हे. तर, काळसर, तेजस्वी, मनोहर चित्ताकर्षक, लावण्य व सौंदर्ययुक्त असा आहे. शिवाय "श्याम" या एकेरी शब्दांत व याच्या योगानें बनलेल्या सामासिक शब्दांत पावित्र्य, अपत्यभाव व दैवी भावना भरलेल्या आहेत, जसें—

श्यामा=पवित्र तुळस व पवित्र यमुना नदी.

श्यामसुंदर=कृष्ण परमात्मा, श्यामकंठ=शंकर, श्यामांग=नवग्रहांतील 'बुध' ग्रह, श्यामकर्ण=अश्वमेधांतील पवित्र अश्व. वगैरे वगैरे.

## माधवरावांचें "श्याम्या" हें नांव.

इतर विशेषणावरून बनलेल्या विशेष नामाप्रमाणें (कृष्ण, काळ्या, सांवळ्या, गोऱ्या वगैरे वगैरे) 'श्याम' या विशेषणाचाही विशेषनामाप्रमाणें उपयोग प्राचीन वाङ्मयांत करीत असत जसें—

'श्यामाचिया घरा वासना पै नेती' (श्रीज्ञानदेवकृत अभंग १७३)

'श्यामाची श्याम सेजवरी' (श्रीनिवृत्तिनाथकृत अभंग २०१)

'तो अर्जुन म्हणे गा तमाल श्यामा' (श्री ज्ञा. अ. १७ ओ. ३४)

उत्तर हिन्दुस्थानांतील गोकुळ, मथुरा, वृंदावन निवासी व्रजांगना (गोपी) तर कृष्ण परमात्माला 'श्याम' खेरीज बोलतच नसत. श्याम हें नांव त्यांचें अत्यंत आवडतें, प्रिय व लाडकें होतें. हिंदी कवी आपल्या परमात्मविषयक कवितेंत, व व्रजांगना आपल्या नेहमीच्या गाण्यांत परमात्माबद्दल प्रामुख्यानें 'श्याम' या नांवाचाच उपयोग करीत. असें—

"कहां गियो मोरा श्याम"

हल्ली ही कृष्ण या नांवाऐवजी 'श्याम हें नांव दक्षिण हिंदुस्थानांत ठेवण्याची बरीच प्रथा पडली आहे. पुष्कळांना हें नांव फार आवडतें. व त्या नांवांत तशीच मोहकता पण आहे.

कृष्ण परमात्मानींही आपलें 'कृष्ण' हें नांव अर्जुनास देऊन तो आपलीच विभूति आहे. जसें—

'पांडवांनां धनंजयः' या श्री. भ. गीतेंतील १० वे अध्यायाच्या ३७ वे श्लोकांत म्हटलें आहे. तसेंच कृष्णावतार बाबांनींहि आपलें मोहक लाडके व अन्वर्थ नांव

'श्याम' हें माधवरावांना देऊन माधवराव ही आपलीच विभूति आहे असें बाबानींसुद्धां कित्येक प्रसंगीं दर्शविलें आहे.

कै. भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोरकर यांच्या वडील चिरंजीवांचे लग्न ग्वाल्हेरीस झाले. आपण लग्नास यावे म्हणून नानासाहेबांनीं बाबानां समक्ष निमंत्रण केलें "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असें बाबा म्हणाले. व त्याप्रमाणें माधवराव लग्नास गेले

कै. भक्तवर्य काका साहेब दीक्षित यांनीं असेंच आपल्या वडील चिरंजीवांचे लग्नाकरतां बाबांना समक्ष निमंत्रण केले, तेव्हांही "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असें बाबा त्यांना म्हणालें व त्याप्रमाणें माधवराव नागपुरास लग्नास गेले.

एकदा काकासाहेब दीक्षीत फार गहिंवरून बाबांकडे द्वारकामाईत आले. काका तुला काय पाहिजे" म्हणून बाबांनीं त्यांना विचारले. काकासाहेब म्हणाले "बाबा आपला सहवास असावा' बाबा म्हणालें 'ह्या श्याम्याला आपल्या जवळ ठेवून घे म्हणजे मी जवळच आहे.' ह्यानंतर काकासाहेब माधवरावांना बहुधा आपल्या जवळ ठेवीत.

एकदां कै. भक्त शौंड बाळासाहेब मीरीकर कोपरगांव मामलतदार यांचा मुक्काम दौंड मनमाड रेल्वेवरील कोपरगांव नजीक चितळी गांवांत श्री मारुति रायाचे मंदिरांत असतां ते शिरडीस बाबांच्या दर्शनास आले. दर्शन घेतल्यावर परत चितळीस जाण्यास त्यांनी बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले 'जा पण माझ्या श्याम्याला बरोबर घेऊन जा' बाळासाहेब बाबांच्या आज्ञेप्रमाणें माधवरावास बरोबर घेऊन गेले. त्याच रात्रीं बाळासाहेबांचे अंगावर मोठा थोरला भयंकर सर्प त्यांना नकळत चढला पण त्यानें दंश करण्याचें पूर्वीच बाळासाहेबांनीं त्याला हातानेंच लांब उडवून दिले. जवळच्या लोकांनी त्याचे तुकडे तुकडे केले. माधवरावांचे सान्निध्यानें व बाबांच्या कृपेनें बाळासाहेब या प्राण संकटांतून वाचलें.

श्रीमंत बापू साहेब बुटी माधवारावांना बाबाप्रमाणें मान देत.

यावरून अर्जुन कृष्णाचे जोडीप्रमाणें ही माधवराव बाबाची जोडी म्हणजे श्याम माधवांची ( माधव-कृष्णरूप बाबा ) जोडी होती असे म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं असें मला वाटतें.याचें प्रत्यंतर पुढें ही कांहीं बाबतींत येईलच.

माधवरावांना बाबा जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत 'श्यामा' म्हणून संबोधीत तसेंच माधवरावही बाबांना प्रथमपासून शेवटपर्यंत 'देवा' म्हणून संबोधीत.

## देवा.

'श्याम' शब्दाप्रमाणें या 'देव' शब्दांतही एकप्रकारची मोहकता, आकर्षता,

पावित्रता, कारुण्य, प्रेम, मातृभाव, उच्चतम भावना भरलेली आहे. तो 'आई ' शब्दा- इतका प्रिय गोड आहे. ' आई आई ' प्रमाणें ' देवा देवा ' या शब्दाचा आपत्प्रसंगी किंवा सलगीचे वेळी ईश्वरावर भरवसा न ठेवणाऱ्या वावदुकाकडून व माता पितरास तुच्छ लेखणाऱ्या अधम पंडितंमन्या कडून सुद्धां उपयोग केला जातो. मग श्रद्धाळू भक्ताकडून व जनाकडून उपयोग केला जातो यांत नवल नाही.

अर्जुनही पुष्कळ वेळां कृष्ण परमात्माला लाडुकपणानें देव म्हणून संबोधी.

' प्रियः प्रियायार्हसि ' देव ' ' सोढूम् ' ' देव देव जगत्पते '

' पश्यामि देवांस्तव देव देहे '

## मी तूं व अरे तुरे

अर्जुन जसे परमात्माला मी, तूं व अरे तुरे करीत असे तसें माधवरावही बाबा- जवळ नेहमी ' मी तूं ची ' व अरे तुरेची भाषा बोलत.

एकदां ब्राम्ही स्थितींत रहा म्हणून सांगतोस व एकदां हा घोर संग्रामही कर असें म्हणतोस. देवा तुला असें दुटप्पी सांगण्याची लाज नाहीं कारे वाटत असें अर्जुन ज्याप्रमाणें एकदां विनोदानें देवास म्हणाला.

इये लाजसीना महाघोरीं । कर्मी सुता ॥ ३ ॥

श्री. ज्ञा. अ. ३

## सलगी व विनोद.

त्याच प्रमाणें एकदां एकादशीस बाबांचे हातावर एका भक्तानें ताजा ऊन ऊन जोंधळ्याचा हुरडा ठेविला. ' बाबा म्हणाले श्याम्या हा घे तुला. ' माधवराव रागानें म्हणालें देवा तुला कांहीं लाज वाटते कारे, आज धडधडीत एकादशी आणि तूं हे मला असलं हुरडा खाण्याचं पाप करायला सांगतोस ! मी नाहीं घेत जा.

बाबा म्हणाले ' बरं नको खाऊ श्याम्या ! '

तसेंच एकदां भक्तराज अर्जुन देवास म्हणाला देवा तूं एकदां सांख्य योगाच अनु- ष्ठान कर म्हणून सांगतोस व एकदां कर्मयोगाचें अनुष्ठान कर म्हणून सांगतोस. यांत खरें काय! आम्ही कोणत्या योगाचें आचरण करावें ?

देवा, तुवांचि ऐसें बोलावें । तरी आम्ही नेणती काय करावें ॥
हां गा उपदेश जरी ऐसा । तरी अपभ्रंश तो कैसा ॥ ७ ॥

श्री. ज्ञा. अ. ३

देवा तूंच जर असे दुटप्पी बोलूं लागलास तर आमच्या सारख्या अजाणत्या लोकांनीं काय करावे ! देवा तुझा उपदेशच जर असा असेल तर आमचा मतिभ्रंश कर्णे

तेंच आणखी निराळे काय असावयाचे असें अर्जुनानें परमात्म्यास एक वेळ थट्टेनें विनोदानें व जरा धिटाइनें विचारिलें. परमात्मा म्हणाले दोन्ही खरेच. पण सांख्यापेक्षां कर्मयोगाचें अनुष्ठान करणें जास्त चांगले.

तसेंच एकदां एका भक्तानें बाबांना विचारलें कीं बाबा एकादशीस कांदा खावा कां न खावा ! बाबा म्हणाले खाऊं नये. तो भक्त पुढें म्हणाला बाबा कांदा तर कंद आहे, मग खायला काय हरकत आहे ? बाबा म्हणाले " खावा तर मग. "

## थट्टा विनोद व धिटाई.

इतक्यांत माधवराव मध्येंच जरा आश्चर्य व उपहासयुक्त मुद्रेनें मोठ्यानें म्हणाले असलं कसलं रे दुटप्पी बोलणं तुझं देवा ! एकादशीस कांहीं खाऊं नये असं एकदां म्हणतोस, आणि एकदां खावं असं पण म्हणतोस. तुझ्या बोलण्याची मोठी गंमत आहे बुवा. आम्ही ही असली वेडीं माणसं म्हणुनशानी तुला विचारायला यावं तर त्वां आम्हांला असं ठकवावं काय रे देवा !

बाबा म्हणाले ' श्याम्या मी मशिदींत बसून खोटें नाहीं बोलत बरं कां तुझ्याच पायाची आंन ( आण=शपथ ) माधवराव म्हणालें मग एकादशीस कांदा खावा कां न खावा हें तर खरं सांगशील किं नाहीं ! बाबा म्हणाले ' एकादशीस कांदा खाऊं नये. आणि जर खावयाचाच असेल तर सबंद खावा. पण ज्याचे अंगांत सबंद कांदा खाऊन जिरवण्याची ताकद असेल त्यानेंच खावा. पण भलत्यानें खाऊं नये. आतां जाय घे उदी. या प्रमाणें बाबांनीं माधवरावांची न रागवतां शांतवृत्तीनें गोड व खुबीदार समजूत केली. ( येथें कांदा=कंदर्प=काम=मदन )

अर्जुनानें एकदां श्रीकृष्ण परमात्म्यास विचारलें कीं देवा तूं म्हणतोस कीं हा योग ( सांख्य व कर्म ) तूं प्रथम सूर्यास सांगितलास व नंतर फार फार काळ गेल्यावर आतां मला सांगितलास. पण मला हें तुझें बोलणें अगदीं खरें वाटत नाहीं. कारण तो सूर्य इतका जुना आहे कीं त्याला आपल्या वाडवडिलांनींहि पाहिलें नाहीं. आणि तूं तर हा अगदीं अलीकडचा. तेव्हां देवा तूं हा योग सूर्याला केव्हांरे सांगायला गेलास ? मला तर ही निवळ लोणकडी थाप दिसते.

तरी मागील जे वार्ता । तुंवा सांगितली होती अनंता ॥
ते नावक मज चित्ता । मानेचि ना ॥ ३६ ॥
जे तो विवस्वत म्हणिजे कायी । ऐसें हें वडिला ठाऊके नाहीं ॥
तरी तुवांचि केवि कहीं । उपदेशिला ॥ ३७ ॥

तो आइकिजे बहुता काळांचा । आणि तूं तव श्रीकृष्ण सांपेचा ॥
म्हणोनि गा इयें मातुचा । विसंवादु ॥ ३८ ॥ श्री. ज्ञा. अ. ४.

बरें तें असूं दे. आतां मी जें विचारीन तें नीट सांग. रागाऊं नकोस,

आतां पुसेन मी जें कांहीं । तेथें निकें चित्त देईं ॥
तेवींचि देवें कोपावें नाहीं । बोला एका ॥ ३५ ॥ श्री. ज्ञा अ. ४.

असें अर्जुनानें विचारलें असतां परमात्मा म्हणाले अर्जुना आतांपर्यंत तुझे पुष्कळ जन्म झाले व माझेहि झाले. तें सर्व मी जाणतो व तूं जाणत नाहींस इतकेंच

त्याचप्रमाणें एकदां माधवरावांनी बाबांना विचारलें कीं देवा ह्या गणपतराव नरक्यांना नोकरी कुठं मिळेल रे ! बाबा म्हणाले "श्याम्या आपल्याला पुण्यांतच राहावयाचं आहे. दुसरीकडे कोठेंहि जावयाचें नाहीं." यावरून माधवरावांनी अजमास केला कीं, गणपतराव यांना पुण्यासच कायमची नोकरी मिळणार. पुढें एक वेळ ब्रह्मदेशांत तात्पुरती नोकरी मिळण्याचा प्रसंग आला होता. तेव्हां डॉ. पिल्ले यानीं बाबांना विचारलें बाबा ब्रह्मदेशची नोकरी चांगली आहे ना ? हे तेथें कायम होतील ना ! बाबा म्हणाले "होय" ही गोष्ट गणपतरावांनीं माधवरावांस सांगितली. सर्वांना या बोलण्याचें आश्चर्य वाटलें कीं, हें काय, बाबा एकाजवळ एक बोलतात, व दुसऱ्याजवळ दुसरेंच बोलतात. माधवराव पुन्हां प्रोफेसर साहेबांना (श्री. गणपतराव नरके) बाबाकडे घेऊन गेले. व म्हणाले काय रे देवा कोणतं खरं ? त्वां मला सांगितलेलं तें खरं कां भाऊला (डॉ. पिल्ले) सांगितलेलें खरं ! बाबा म्हणाले "तुला सांगितलेलं खरं" डॉ. पिल्लयानीं पुन्हा हंसत हंसत विचारलें बाबा मला सांगितलेलं खरं कीं आतां माधवरावांना सांगितलेलं खरं ? बाबा म्हणाले, "श्याम्याला सांगितलेलं खरं" शेंवटीं तेंच खरें झालें.

एकदां माधवरावांनीं बाबांजवळ प्रश्न काढला कीं, काय रे देवा रामायणांत लिहिलं आहे कीं रामांनी रावणाबरोबर लढाई करायच्या वेळीं समुद्रावर पूल बांधला. तेव्हां रामांनीं तिथं एक कोटि वानर सैन्य जमा केलं होतं. देवा हें खरं काय रे ! देवा राम खरे काय रे ! बाबा म्हणाले श्याम्या हें समदं खरं आहे बरं कां. रामहि खरे आहेत बरं. माधवराव म्हणाले देवा हे एक कोटि वानर कुठं व कसे बसले होते रे ? बाबा म्हणाले "ते समदे वाजेर झाडांवर मुंग्यावाणी बसले होते बरं कां श्याम्या." माधवराव म्हणाले देवा हें त्वां डोळ्यांनं पाहिलं कां रे ! बाबा म्हणाले 'हो हो म्यां डोळ्यानं पाहिलें बरं कां श्याम्या.' माधवराव म्हणाले देवा तुझी ही लोनकडी थाप आहे. देवा तूं तर माझ्या समक्ष इथं आलास तेव्हां तुला मिसुरडंहि फुटलं नव्हतं अन् मग तूं ते

वाण्गेर केव्हां रे बघायला गेला होतास ? बाबा म्हणाले ' श्याम्या तुझ्या व माझ्या फार पिढ्या झाल्या. त्या समयाचा मला आठव आहे आणि तुला नाहीं. ' माधवरावांनीं विचारलें देवा तूं तेव्हां केव्हडा होतास रे ? बाबा म्हणालें ' आतां आहे एव्हडाच श्याम्या. ' माधवराव म्हणालें देवा हें खरं काय रे ? बाबा म्हणालें ' श्याम्या मी मशीदींत बसून खोटं बोलतो कां रे ? श्याम्या मी खोटं नाहीं बोलत बरं ' माधवराव म्हणाले देवा तूं इतका पुराना आहेस कां रे ? ' होय. यांत कांहीं खोटं नाहीं तुझी शपथ श्याम्या. ' बाबा म्हणाले. एकदां परमात्म्यानींसुद्धां असेंच अर्जुनाजवळ म्हणून शपथ वाहिली.

" यया बोला माझारी । होय नव्हे ह्मणें करी ॥

येथ आन आथी तरी । तुझीच आण ॥ १३८ ॥ श्री. ज्ञा. अ. १८

## देवाची हजेरी

बाबा जसें तात्या पाटील, बडेबाबा, रामचंद्र पाटील, बयाजी पाटील वगैरे भक्तांना रोज पैसे देत तसें माधवरावांना ते कधींही देत नसत. माधवराव सर्व भक्तांमध्यें बाबांचे फार लाडके व फार बोलके. ते एकदां बाबांना म्हणाले, देवा तूं तर फार उदार आहेस असें लोक म्हणतात. तूं कोनाला जमीन जुमला देतोस, कुनाला बायको, कुनाला पोर देतोस, कुनाला इद्या कुनाला पैका देतोस. आन् आम्ही तुझ्या पायाजवळ नेहमीं राहून नेहमी आपत्ति भोगितो. तमाखु पियाला सुद्धां तूं कधीं आम्हांला दिडकी दुगानी देत नाहींत. हें असं कसं रे देवा ? मी तर म्हनतो तुझ्यासारखा खव्याळ आन् भिकारडा देव साऱ्या दुनियेंत नाहीं. डोइला फडकं गुंडाळतोस. मशींदींत झगरं पेटवून बसतोस. चिलीम फुंकितोस. आन् गांवांत टुकडे मागून आणून खातोस. तूं रे काय आम्हांला देनार ? मला तर वाटतं तूं मोठा कृपण नि करंटा आहेस देवा ! तूं देव देव म्हणून मिरवितोस. तुला देव कुनी रे केला देवा ? अरे तुला देव आम्हीच केला. नाहीं तर तुला भिकमाग्या फकिरड्याला इचारीत कोन होतं रे ? माधवराव कसेंही बोललें तरी बाबांना त्याचें कौतुकच वाटे. बाबा म्हणाले, " पैसा अडका तुझ्याकरतां नाहीं बरं कां श्याम्या. तुझ्याकरतां न्यारंच आहे. " माधवराव खूण समजले व गप बसले.

## देवाची खरडपट्टी

एकदां माधवरावांचे डोळे आले. सुजले. व त्यांना खूप ठणका लागला. माधवरावांनीं पुष्कळ औषधोपचार केले पण कशानें गूण येईना. शेवटीं संतापून रागावून बाबांकडे गेले बाबांनीं विचारलें, " काय शाम्या कसं काय आहे ? " माधवराव कातावून म्हणाले, देवा तुझ्यासारखा दुष्ट, नष्ट, खव्याळ देव कुनी नाहीं. लोकांना दवा देतोस,

त्यांच्या याधी नाहिंशा करितोस आन माझे डोळे सुजून इतका ठनका लागला आहे, कीं मी आज सारखा दोन चार दिवस ठन ठन ठन बोंबा मारितो, आरडतो, ओरडतो तुला लाज नाहीं वाटत कारे ? अरे तूं काय आंधळा झालास कां बहिरा झालास ? अरे, तुझे डोळे नि कान का फुटले का काय ? अरे तुला दिसत कसं नाहीं आन ऐकायला पन कसं येत नाही ? असला कसला तूं देव ? बघ देवा जर का माझे डोळे उद्या सकाळीं बरे नाहीं झाले तर तुला मशिदीतून हाकलून लावीन तरच मी नावांचा शाम्या. बाबा म्हणाले " उगाच बटबट करूं नको शाम्या. सात मिऱ्याचे दाणे पाण्यांत उगाळ, आणि दे डोळ्यांत घालून, म्हणजे बघ तुझे डोळे भिंगावाणी होतील. जाय, जाय, उठ, घे उदी

माधवराव खूप संतापून म्हणाले देवा तूं तर फारच शहाणा दिसतोस रे ! अरे ही वैदगिरी तूं कुठं रे शिकला देवा ? मिरें वाटून डोळयांत वाटून घेऊन मी आपले डोळे फोडून घेऊं होय ! चांगली आहे तुझी वैदगिरी लोकांची डोळे फोडण्याची बुवा. बाबा शांतपणानें म्हणाले'जाय जाय आतां फार शहाणपणा नको करूं.अगोदर करून पहा अन् मग डोळे नाहीं बरे झाले तर रागाव. '

माधवराव जरी असें बोलत तरी बाबांचे शब्दावर त्यांचा पूर्ण भरवंसा असे. माधवरावांनीं त्याप्रमाणें केलें व त्यांचे डोळे ताबडतोब खडखडीत बरे झाले.

## माधवराव बाबांना ज्ञान शिकवूं पहातात. बाबा त्यांची कान उघाडणी करून समजूत करतात.

अर्जुनानें एकदां दिसण्यांत दिसणाऱ्या परमात्माच्या असंबद्ध बोलण्याबद्दल परत्म्याला रागावून असाच दोष दिला व म्हटलें कीं देवा वैद्यच जर पथ्य करायला सांगून रोग्याचें औषधांत विष कालवूं लागला. तर त्या रोग्यानें कसें जगावें रे देवा ?

' वैद्य पथ्य करुनि जाये । मग ज़री आपणचि विष सुये ॥
तरी रोगिया कैसेनि जिये । सांगे मज ' ॥ ८ ॥

श्री. ज्ञा. अ. ३

परमात्मा म्हणाले अर्जुना तूं स्वतःला शहाणा समजतोस पण अज्ञान सोडीत नाहीस. व तुला शिकवूं म्हणावें तर तूंच आम्हाला मोठमोठ्या नीतीच्या गोष्टी सांगतोस.

' तूं जाणता तरी म्हणवीसी । परी नेणिवेंते न सांडिसी ॥
आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी । बहुसाल नीति ' ॥ ९२ ॥

श्री. ज्ञा. अ. २

म्हणून अर्जुना प्रथम मी सांगतो तसें कर ( अभ्यास कर ) व त्याप्रमाणें न आलें तर रागाव.

' हेंचि कायिसयावरी होवे । ऐसा जरी संदेहो वर्तताहे ॥

तरी अभ्यासूनि आदि पाहे । मग नव्हे तरी कोपे ॥ ८० ॥ श्री. ज्ञा. अ. ८

एका औरंगाबादेस राहणारे श्रीमंताचे बाईस मूल नव्हते. म्हणून ती शिरडीस बाबांचे दर्शनास गेली. तिनें आपला हेतु माधवरावास सांगितला. माधवरावांनीं तिला नारळ घेऊन येऊन श्री द्वारकामाईत बसावयास सांगितलें. नंतर बाबा खुषींत आहेत अशी संधि पाहून माधवरावांनीं नारळ बाबांचे हातांत देऊन बाबांचे चरणावर मस्तक ठेवण्यास त्या बाईस खुणावले. त्या बाईनें तसें केले. माधवराव म्हणाले देवा घाल हा नारळ तिच्या ओट्यांत, व तुला मुलगा होईल असा तिला दे आशिर्वाद. बाबा म्हणाले " आपण नाहीं बुवा घालीत तिच्या ओट्यांत नारळ. अशा नारळान कुठं पोरं होतात कां रे श्याम्या ! नंतर पुढें बरीच हुजत घालून बाबाकडून तो नारळ माधवरावांनीं त्या बाईचें ओटयांत घालून दिला. व अल्ला तेरेकु लडका देयगा " असा आशीर्वादही तिला देवविला. माधवराव म्हणाले देवा वर्षाच्या आंत लडका होईल असं म्हण. बाबा म्हणाले " बरं श्याम्या वर्षाच्या आंत होईल तिला लडका. " माधवराव म्हणाले बघ बरं कां देवा जर कां वर्षाच्या आंत या बाईला मुलगा झाला नाहीं तर हाच नारळ तुझ्या टाळ-क्यांत हानीन बरं कां देवा. बाबा हंसून व शांतपणें म्हणाले " जाय जाय श्याम्या; होईल होईल जाय् ' त्या प्रमाणें त्या बाईला वर्षाचे आंत मुलगा झाला व तिनें तावडतोब शिरडीस येऊन त्यास बाबांचे पायावर घातले. माधवराव कितीही संतापले. व रागावले किंवा उपहासानें अमर्यादेनें, अनादरानें दांडगेपणानें बोलले तरी बाबा कधीं रागावत नसत पण शांतपणें त्यांचीं समजूत घालीत.

## माधवरावांची बाबांना थट्टेची व प्रेमाची धमकी

माधवरावांनीं दुपारची बाबांची आरती झाली म्हणजे बाबांना रोज मोठ्यानें म्हणावे ( दरडाऊन ) देवा ऊठ देवा ऊठ. चल आपल्या जागेवर. बैस ( भक्तांनी आणि लेले नैवेद्य एके ठिकाणी करून तों सर्वांना वाटून देण्याकरतां ) त्या निवेदाचा कर काला आन् दे समद्यांना वाटून. असें माधवरावांनीं म्हटल्या बरोबर बाबा हं कीं चूं न करता आपल्या नेहमीच्या जागेवरून उठून निंबराजवळ जाऊन बसत व माधवराव सांगतील तसें करीत. माधवरावांचे बोल बाबांना गोड लागत. माधवरावांचें बाबांना जणुं काय वेडच लागलें होते. माधवरावांच्या वाचेने सर्व लळे बाबा पुरवीत असत.

अर्जुन सुद्धा कित्येक वेळा परमात्म्याला असेंच रागानें बोले पण परमात्मा जास्त कांहीं न बोलतां निमूटपणें शांत चित्तानें तें सर्व सहन करून त्याची समजूत करीत. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी श्री संजयमुखद्वारां या गोष्टींचें फारच सुंदर व सुरस वर्णन केलें आहे.

## बाबांना माधवरावांचे वेड.

" पढविलें पाखरूं ऐसें न बोलें । या परी क्रीडामृग ही तैसा न चले ॥
कैसे देव येथें सुरवाडले । तें जाणों नये ॥ १७० ॥
आजि परब्रह्म हें सगळें । भोगावया सदैव याचेच डोळे ॥
कैसे याचे हे हन लळे । पाळीत असे. ॥ १७१ ॥
हा कोपे कीं निवांत साहे । हा रुसे तरी बुझावीत जाये ॥
नवल पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा ॥ १७२ ॥

श्री ज्ञा. अ. ११

## रात्रीं बेरात्रीं माधवरावांना श्री द्वारकामाईत बाबाकडे जाण्याची केव्हांही बंदी नव्हती.

सायंकाळ झाली कीं ३–४ विवक्षित भक्तां खेरीज इतरांना श्री द्वारकामाईत जाण्याची बाबाकडून सक्त बंदी असे परंतु माधवरावांना मात्र मोकळीक असे. श्री तात्यासाहेब नूलकर यांचे देहावसानसमयीं आपल्यास बाबांच्या चरणाचें तीर्थ मिळावें अशी इच्छा तात्यासाहेबांनीं प्रदर्शित केली. ज्यावेळीं रात्रीचा १–२ वाजण्याचा समय मशिदींत बाबाकडे त्यावेळीं जाणार कोण ? माधवरावांनीं कमर बांधली. व पंचपात्रींत पळी व पाणी घेऊन मशिदींत गेले. बाबा जाग्यावरून उठून कोण आहे म्हणून ओरडले. मी श्यामा आहे असें माधवराव म्हणाले. या वेळीं इथं आलास ? असें म्हणत, शिव्या देत, मारण्याच्या अविशानें ओट्याच्या काठांवर एक पाय पुढें करून बाबा उभे राहिले तात्यासाहेबाचा प्राण चालला आहे आन् तो तुझ्या पायाचं तीर्थ मागतोय देवा. देशि देशि लवकर तीर्थ. बाबा नाहीं म्हणतच आहेत. माधवराव धिटाईनें पुढें सरकतच आहेत. पण बाबांनीं जरी नरसिंह अवताराचें सोंग घेतले होतें तरी तीर्थ देण्याकरतां पायाचा अंगठा पुढें करून ठेविलाच होता. माधवरावांनीं तसाच बाबांचा अंगठा पंचपात्रीतील पाण्यांत बुडवून घेतला. व तात्या साहेबांची शेवटची इच्छा पुरी केली.

अर्जुना संबंधानें श्री ज्ञानेश्वर माउली एके ठिकाणीं लिहितात तसेंच हें झालें.

' म्हणोनी बहु दिवस वोळगावा । कां अवसरू पाहोनि विनवावा ॥

हा ही सोस तया सदैवा । पडेचि ना ' ॥ १३८ ॥ श्री. ज्ञा. अ. ६

' जैसें मातेच्या ठायीं । आपल्या अनवसरू नाहीं ॥

स्तन्यालागोनि पाही । जिया परी ॥ २९ ॥ श्री. ज्ञा. अ. ३

आई जवळ कोठे व कांही बोलण्याला व वेळीं अवेळीं स्तन्य ( अंगावरील दूध ) मागण्याला जशी बालकाला बंदी नसते तसेंच माधवरावाना बाबांजवळ केव्हांही व कोठेही बोलण्याला व कांहीही मागण्याला व बाबांकडे जाण्याला बंदी नव्हती. बाबांकडे रात्रीं जाण्याला व दिवसा त्यांचे जेवणाचे वेळीं त्यांचेकडे जाण्याला त्यांची नेहमीची २–४ माणसें खेरीज करून सर्वांना बंदी असे. पण माधवरावांना ती केव्हांच नव्हती.

## माधवरावांवरील बाबांचें अकृत्रिम व अवर्णनीय प्रेम

बाबांनीं माधवरावांना जरी विपुल संपत्ती दिली नाही, तरी माधवरावांवरील बाबांचें प्रेम अवर्णनीय होते यांत तिलप्राय शंका नाहीं. एखादे भक्तानें बाबांचा आपणास प्रसाद मिळावा या हेतुनें एखादी प्रिय वस्तु बाबांचे हातांत घ्यावी व बाबांजवळून ती परत मागावी. श्याम्या ही ठेव तुला असें म्हणून बाबानीं ती वस्तु ( श्री एकनाथी भागवताची पोथी, श्री विष्णु सहस्रनाम, चांदीच्या बाबांच्या पादुका, बाबांची शाडूची सुंदर मूर्ति वगैरे वगैरे ) माधवरावास द्यावी.

.तसेंच दररोजच्या दुपारच्या नानाविध नैवेद्यान्नाचा काला करून बाबा सर्वांना वाटून देत पण माधवराव तो सबगोलंकृत काला खाणार नाहींत हें समजून बाबा, श्री. द्वारकामाईतील सर्वांचें काला भोजन आटोपल्यावर माधवरावांना हापूसच्या आंब्याच्या फोडींनी भरलेली बशी नित्यनेमाने दररोज देत.

## माधवरावांचे लाड व लळे.

माधवरावांना बाबांनीं, श्री तात्या पाटील, बडेबाबा, बयाजी पाटील, रामचंद्र पाटील वगैरे मंडळीप्रमाणें जरी दररोज पैसे दिले नाहींत किंवा कधीं एकदम दहा पांच हजार रुपयेहि दिले नाहींत. इतकेंच नव्हें पण श्री. शिंदे सरकार ( कै. श्री. माधवराव साहेब ) त्यांना पांच हजार रुपये देत असतां बाबांनी त्यांना तेहि देऊं दिलें नाहींत, तरी पण ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नानाप्रकारचे भोग व ऐश्वर्य ही त्यांना भोगावयास देऊन बाबांनी माधवरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अति खर्चाच्या व अत्यंत श्रमाच्या व दगदगीच्या ज्या हिंदुस्थानांतील चारी धामाच्या [ श्री द्वारका, रामेश्वर, जगन्नाथ, व बद्री नारायण, बद्री केदार, गंगोत्री, जम्नोत्री वगैरे वगैरे ] व श्री काशी, अयोध्या, गोकुळ, मथुरा, वृंदावन, गया, हरीद्वार, प्रयाग, उज्जैन, गिरनार,

मातृगया, नाशिक, त्रिंबकेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट, दौलताबाद, पंढरपूर, बालाजी, श्रीरंगपट्टण, कांची, कामाक्षी मधुरा, मीनाक्षी, पक्षीतीर्थ, वगैरे इतर पुज्य व महत्वाच्या यात्रा विनामूल्य बाबांनी अनायासें माधवरावांना आनंदांत, सुखांत व ऐषआरामांत कोट्याधीशांचें व लक्षाधीशांचें सहवासांत करून दिल्या. हत्तीचे अंबारींत माधवरावांना बसवून त्यांची मिरवणूक काढविली. शिंदे सरकार, जव्हार सरकार, कोट्याधीश सावकार, जहागिरदार, राष्ट्रपुरुष राजकारणी विभूती, इनामदार, मोठमोठे सरकारी अधिकारी, व सुखवस्तु लोक, यांचे माधवरावांना कांही प्रसंगीं सन्मान्य पाहुणे बनवून त्यांना माधवरावांना प्रेमालिंगन घ्यावयास लावून माधवरावांचे पाया पडावयास लाविलें. मग माधवरावांच्या फिरण्याच्या खाण्यापिण्याच्या, उतरण्याच्या व ऐषआरामाच्या थाटास काय विचारावें ! या सर्व ठिकाणी बाबांच्या लीला वर्णन करून सर्वांचीं मनें प्रफुल्लित व आनंदित करणें व बाबांची प्रसिद्धी करणें हीच माधवरावांची मुख्य कामगिरी.

## माधवरावांनीं बजावलेलें प्रचारकार्य

माधवराव बहुतेक सर्व हिंदुस्थानांत फिरले व ते जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांनी व्याख्यानें किंवा प्रवचनें दिलीं नाहींत किंवा कीर्तनें केलीं नाहीत पण त्यांच्या त्या देसोरी पण रसाळ व प्रसादयुक्त वाणीनें बाबांच्या पुण्य व दिव्य लीला सर्वांना सांगून त्यांनी श्रोत्यांचें अंतःकरणावर अद्वितीय सगुणावतार संतमहात्म्य बाबांचे महत्व बिंबवून त्यांना बाबांचें भक्त बनवून त्यांना बाबांच्या दर्शनाची तीव्र लालसा तळमळ व उत्कंठा लावून दिली. माझ्यामतें याप्रकारें माधवरावांनीं कै. भक्तसिंह नानासाहेब चांदोरकरांप्रमाणें बाबांच्या प्रचारकार्याची कामगिरी उत्तम प्रकारें बजाविली. पण ही कोणाचे क्वचितच लक्षांत आली असेल. नानासाहेब हे सरकारी सेवावृत्तींत असल्यामुळें व त्यांची सेवा विवक्षित ठिकाणींच झाली असल्यामुळें त्यांचें प्रचारकार्य मर्यादित असणें साहाजिकच होतें. परंतु माधवरावांचें कार्य मात्र आसेतु हिमालयापर्यंत व आद्वारावती जगन्नाथापर्यंत झालें असें म्हणण्यास बिलकूल हरकत नाहीं. कीर्तनें, प्रवचनें व्याख्याने यांचा जसा गाजावाजा होतो तसा माधवरावांचे कार्याचा कोठेंही गाजावाजा झाला नाहीं. पण त्यांचे हातून सहजासहजीं मोठें व विस्तृत प्रचारकार्य झालें असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

अर्जुनाला श्रीमद्भगवद्गीता सांगण्यानें परमात्मानें आपलें प्रचार कार्य जसें अर्जुनाकरवीं अखिल जगास विदित करून दिलें, तसेंच माधवरावांना ‘ श्याम्या ’ नामाभिधानानें आपलें प्रतिनिधित्व देऊन, लीलाकथनद्वारें माधवरावांकरवी बाबांनी

आपलें प्रचारकार्य आपल्या अखिल मायभूमींत शांतपणें करून घेतलें, यांत शंका नाहीं.

माधवराव एकदां बाबांना म्हणाले देवा ब्रम्हलोक, विष्णुलोक, व शिवलोक हे खरे आहेत का रे ? बाबा म्हणाले ' होय खरे आहेत श्याम्या मग देवा तूं ते आम्हांला कां दाखवीत नाहीस रे ! बाबा म्हणाले ' श्याम्या ऐहिक ऐश्वर्याप्रमाणें हें देवांचें ऐश्वर्य ही तुच्छ आहे ते आपल्याला नको.माधवराव म्हणाले पण ते आम्हाला दाखीव तर खरें. बाबा म्हणाले "डोळे मीट श्याम्या व आतां उघड श्याम्या माधवरावांनीं तसें केलें. माधवरावांना स्वर्गीय, दैदीप्यमान, अप्रतिम वैभवयुक्त, डोळे दिपविणारी सुखानंदकारक, भीति व आदर उत्पन्न करणारी, अशी एक भव्य व विस्तृत, रत्नजडित सिंहासनाधिष्ठित ब्रम्हदेवासह मोठी सभा दिसली. बाबा म्हणाले ' श्याम्या हा सत्यलोक व हे श्री ब्रम्हदेव बर कां ! आतां पुन्हां डोळे मीट व उघड ' माधवरावांनीं तसें केलें त्यांना वरपेक्षां जास्त सौंदर्य व ऐश्वर्ययुक्त अशी रत्नजडित सिंहासनाधिष्ठित श्री विष्णुच्या मूर्तिसह मोठी भव्य सभा दिसली. ' श्याम्या हां वैकुंठ लोक व हे विष्णु बरं कां ! आतां पुन्हा डोळे मीट व उघड, व माधवरावांनीं तसें केलें. त्यांना अत्यंत प्रेक्षणीय विलोभनीय नयन सुभग अशी रत्नजडित सिंहासनस्थित श्री शंकराच्या मूर्तिसह अत्यंत मोठी सभा दिसली. ' श्याम्या हा कैलास लोक व हे श्री शंकर, बरं कां ? ' असें बाबा म्हणाले. ' पण श्याम्या हें आपल्याकरतां नव्हे. आपल्याकरतां निराळेंच आहे. ' असें बाबांनीं माधवरावांना सांगितलें. माधवरावांना समाधान वाटलें. हें मागणें म्हणजे अर्जुनाच्या विश्वरूपाच्या मागणीप्रमाणें नव्हे का ? व डोळे झांक व उघड असें सांगण्याचें माधवरावांना अर्जुनाप्रमाणें दिव्य दृष्टी दिली तशीच नाहीं कां ?

एके वेळीं अर्जुनानें परमात्माजवळ असेंच विलक्षण मागणें केलें. अर्जुन म्हणाला, देवा दोन मार्गापैकीं मला असा एक मार्ग सांग कीं, मला सोपेपणानें पालखीसारख्या सुखदायक वाहनांत बसून झोंप घेत घेत सुखानें पुष्कळ मार्ग क्रमीत मोक्षाला जाता येईल.

" जैसें निद्रेचें सुख न मोडे । आणि मार्ग तरी बहुसाल सांडे ॥
तैसें सुखासना सांगडे । सोहपें होय ॥ ८ ॥

श्री. ज्ञा. अ. ५

परमात्मांनीं अर्जुनाच्या इच्छेप्रमाणें त्याला कर्ममार्गाचा उपदेश करून मोक्षास जाण्याचा अत्यंत सोपा मार्ग दाखविला.

एकदां अर्जुनानें असाच हट्ट घेऊन परमात्माजवळ नौकेंत बसून जाण्यापेक्षां किंवा

बाहुबळानें पोहून भवसागराच्या पलीकडे जाण्यापेक्षां मधलाच पाय उताराचा मार्ग दाखवा असें मागणें केलें.

" येऱ्हवी तरी अवधारा । जो दाविला तुम्ही अनुसारा ॥
तो पव्हण्याहूनि पायउतारा । सोहपा जैसा ॥ १६५ ॥
म्हणोनि एक वेळ देवा । तोंचि पडताळा घेयावा ॥
विस्तारेल तरी सांगावा । सायंत चि ॥ १६७ ॥

श्री. ज्ञा. अ. ५

त्याप्रमाणें परमात्मांनीं अर्जुनास हटयोग सांगितला.

तसेंच एकदां अर्जुनानें परमात्माजवळ निःशंकपणें मागणें केलें कीं, देवा तुझ्या सर्वव्यापकत्वाबद्दल मनाची खात्री झाली. पण अद्याप डोळ्याची खात्री होत नाहीं. तरी डोळ्याची खात्री होईल असें तें तुझें विश्वरूप दाखव.

" म्हणे हे चित्तहृदया आतुली प्रतीति । बाहेरी अवतरो कां डोळयाप्रती ॥
इया आर्तीचिया पाउलीं मती । उठती जाहली ॥ ३३१ ॥
मियां इहींच दोहीं डोळां । झोंबावें विश्वरूपा सकळा ॥
येवढी हांव तो दैवा आगळा । म्हणवूनि करी ॥ ३३२ ॥

श्री. ज्ञा. अ. १०

त्याप्रमाणें परमात्मांनीं जें त्यांनीं कधीं कोणास दाखविलें नव्हतें तें विश्वरूप अर्जुनास दाखवून त्याच्या मनाप्रमाणें डोळ्यांचेंही समाधान करून त्याचे कोड पुरविलें.

वर दिलेल्या माधवरावांच्या व बाबांच्या संवादावरून व माधवरावास भोगावयास लावलेल्या राजैश्वर्यावरून व कधींही कोणास न दाखविलेलें अशक्य कोटीतील स्वर्गीय ऐश्वर्य त्यांना दाखवून बाबांनीं माधवरावांचें कोड कौतुक पुरविलें नाहीं कां ?

माधवरावांच्या जन्मापासून आतांपर्यंतच्या त्यांच्या परिस्थितीवरून तरी आपलें कोणत्याही प्रकारें अति उच्च कोडकौतुक पुरलें जाईल असें त्यांच्या किंवा इतरांच्या कधीं स्वप्नींही आलें नसेल. परंतु बाबांसारखे सद्गुरू सतत ४०–४२ वर्षें लाभल्यावर माधवरावांचे सर्व मनोरथ कां पुरे होऊं नयेत ?

" देवा तुज ऐसा निजगुरू । आर्तिंधणी कां न करूं ॥
एथ भीड कवणाची धरूं । तूं माय आमुची ॥ २१ ॥

श्री. ज्ञा. अ. ३

देखा कामधेनु ऐसी माये । संदैव जया होय ॥
तो चंद्रही परी लाहे ॥ खेळावया ॥ १० ॥

श्री. ज्ञा. अ. ५

## माधवरावांचा बाबा खोटें बोलतात म्हणून बाबांवर आरोप

एक दिवस माधवराव बाबांचे जवळ बसले असतां एक इसम बाबांचेजवळ पैसे मागण्याकरतां आला. तो श्रीद्वारकामाईत येण्यापूर्वीच बाबांनी आपल्या खिशांतील पैसे आपल्या बसण्याच्या बस्कराखाली घालून ठेविले व त्याला म्हणाले, " आपल्याजवळ पैसे बियसे नाहींत बुवा. " असें सांगितल्यावर तो इसम निघून गेला. हा बाबांचा सर्व खेळ माधवरावांनी पाहिला व माधवराव बाबांना म्हणाले, कायरे देवा तूं तर आम्हांला म्हन्तोस कीं खोटं बोलूं नये. आन् तूं रे कसं खोटं बोल्तोस देवा! बस्कराखालीं दडपून ठेवितोस पैसे. आन् त्याला म्हन्तोस आपल्याजवळ पैसे नाहींत बुवा. तूं मोठा चांगलाच देव आहेस. बाबा म्हणाले, " पैसे द्यावयाचें नसलें म्हणजे असंच करावं लागतं व बोलावं लागतं श्याम्या. यांत कसलं खोटं बोलणं आहे श्याम्या. "

## माधवरावांचा बाबा चोरी करतात म्हणून बाबांवर आरोप

एकदां एका रामदाश्याचे पोथ्यांचे रुमालांतून, बाबांनी त्याला कांही काम सांगून बाजारांत पाठवून, त्याच्या मागे त्याचा रुमाल सोडून, हळूच विष्णुसहस्रनामाची पोथी काढून घेतली. व तो द्वारकामाईत परत येण्यापूर्वीच माधवरावाजवळ देऊन बाबा त्यांना हंसत हंसत म्हणाले, " श्याम्या ही ठेव तुला पोथी. " माधवराव संतापून म्हणाले, " मला नको ती तुझी पोथी. " बाबा म्हणाले, " ठेव ठेव तुलाच ठेव ती श्याम्या. " यावर माधवराव पुन्हां रागावून म्हणाले, देवा तूं सुद्धां खोटं सांगून पोट दुखीचे ढोंग करून अशा चोऱ्या करितो कारे? आपन चोऱ्या करून लोकावर आळ घाल्तोस व आपन नामानिराळा राहतोस. अर कुठं शिकला तूं ही खोटं बोलण्याची व चोऱ्या करन्याची इद्या? बाबा म्हणाले, " श्याम्या अरे ही कसली चोरी व हें कसलं खोटं बोलणं! " ( श्रीकृष्ण परमात्मांच्या गोकुळातील गोपगोपींशी कलागती लावणं, खोटं बोलणं व चोऱ्या करणं, या चरित्राप्रमाणेंच हें बाबांचें चरित्रही गूढ आहे. )

त्यावर माधवराव उद्गारले. देवा तूं मोठा देव आहेस. तूं खोटं बोललास किंवा चोऱ्या केल्यास तरी तुला येडा, कपटी, खोटा, चोर, कुनी म्हणाव रे देवा? आम्ही आपली येडीं मानसं. तूं बोल्तोस तें ऐकून घेतो व सहनही करितो. तुझं उनं ( उणें ) कुनी काढावें रे देवा. तें सहन करावं तेंच बरं. बरं देवा तूं आम्हांला थापा ही देतोस, गोड गोड ही बोल्तोस. बोलतां बोल्तां गळ्याची, पायाची आन ( आण शपथ ) ही घेतोस. अरे असे नाना तऱ्हेचे चाळे करितोस. तुझ्या बोलन्याला आन् ( आणि ) करन्याला कांही मेळ आहे कारे देवा?

" श्याम्या तूं रागाऊं नको, जाय, जाय, घे उदी " बाबा म्हणाले.

" परी राणेपणें शार्ङ्गधरा । बोला हें तुम्ही " ॥ ३२३ ॥

श्री. ज्ञा. अ. १०

" परी तुमचें हें उणें न बोलावें । मी चि साहें तेंचि बरवें ॥ १६० ॥

श्री. ज्ञा. अ. ११

" यावरी सांगो बैससी । कां सांगतां भाष ही देसी ॥

या तुझिया विनोदासी । पात्र आहे जी ॥ १३७५ ॥

श्री. ज्ञा. अ. १८

" मग म्हणे तुवां न कोपावें । आमुचिया बोला ॥ ३२४ ॥

श्री. ज्ञा. अ. १०

वर श्रीज्ञानेश्वर माउलींनीं वर्णन केल्याप्रमाणें अर्जुन परमात्माजवळ व परमात्मा अर्जुनाजवळ मस्करीनें व विनोदानें नेहमीं गोष्टी करीत. तसाच हुबेहुब हा श्याम माधवांचा ( श्याम=माधवराव, व माधव=बाबा. किंवा श्याम=बाबा व माधव=माधवराव) विनोदी व थट्टा मस्करीचा संवाद नव्हे काय !

बाबांचे रोजचे टपाल त्यांना वाचून दाखविण्याचे, बाबा सांगतील त्याप्रमाणें भक्तांना पत्रांची उत्तरे लिहिण्याचें, बाबांच्या नांवावर आलेल्या मनी ऑर्डरी घेण्याचें, व त्यांचे पैसे बाबांना नेऊन देण्याचें काम कांहीं दिवस माधवरावाकडे होते. एक दिवशीं बाबांना देण्याकरतां एका भक्तानें दोन रुपयांची मनी ऑर्डर बाबांकडे पाठविली. माधवरावांनीं ती मनी ऑर्डर घेतली. त्यांचे मनांत कपट आले. त्यांनीं ते पैसे बाबांना न देतां श्री द्वारकामाईचें रस्त्यावरील मोठ्या दरवाजाच्या बाहेरील भिंतीजवळ पुरून ठेविले. त्यांना वाटले देवाला हें कशानें कळणार आहे ? या गोष्टीस बरेच दिवस झाले. माधवरावांचे घरीं एक रात्रीं दोन अडीचशें रुपयांची चोरी झाली. तेव्हां माधवराव दुःखी कष्टी होऊन तळमळूं लागले. पण करतात काय ? पुष्कळ तपास केला. पण चोरीचा पत्ता लागला नाहीं.

## बाबांच्या चोरीबद्दल माधवरावांस शिक्षा

शेवटीं बाबांच्या मोठ्या अदालतींत येऊन माधवरावांनीं आपलें गाऱ्हाणें बाबांचे कानावर घातलें व म्हणाले देवा ही बघ माझी गरिबाची दोन अडिचशें रुपयांची चोरी झाली तुला बरं वाटतं कां रे देवा. तुझ्यावांचून आम्ही आपलं गाऱ्हाणं कोणाकडे न्यावं रे देवा ! बाबांनीं तें सर्व ऐकून घेतलें व शांतपणानें म्हणाले " अंः श्याम्या यांत काय आहे रे. अरे तुझी चोरी झाली म्हणून तूं मजकडे गाऱ्हाणं घेऊन आलास. पण माझी

दोन रुपयांची चोरी झाली त्याचं गाऱ्हाणं मी कोणाकडे नेऊं रे श्याम्या ?" माधवराव समजले व म्हणाले तर मग देवा माझी चोरी त्वांच करविली काय रे ? अरे तूं मोठा खटयाळ आहेस. तुझ्या दोन रुपयांकरतां मला गरिबाला एवढी दोन अडिचशें रुपयाच्या चोरीची शिक्षा काय रे ! अरे हा कां न्याय आहे कां रे देवा ? 'श्याम्या तुला जशी दोन अडिचशे रुपयांची किंमत तशीच मला फकीराला दोन रुपयाची किंमत बाबा म्हणाले. माधवराव गप बसले.

इतर कांहीं भक्त जसें बाबांची नित्य पूजा करीत, त्यांना न्याहारी देत (जोग आई, सगुण नाईक) व नैवेद्य ही देत, तसें माधवराव बाबांची प्रत्यक्ष पूजा करीत नसत किंवा न्याहारी व नैवेद्य ही नेत नसत. तरी त्यांची बाबांवरची अलोट, अनन्य एकनिष्ठ व निस्सीम भक्ति होती. त्यांनीं बाबांच्या आज्ञेवरून बाबांकरतां अठरा वर्षे बाबा प्रमाणें ओली भिक्षा मागितली. प्रथम प्रथम कांहीं वर्षें तें बाबांना संत म्हणून जरी मानीत नसत तरी नंतर ते बाबांना पूर्ण ब्रम्ह श्री कृष्ण प्रभूची मूर्तिमंत सगुणता मानूं लागले. त्यांचें जिव्हेवर बाबांचें नांव निरंतर नाचत असे. त्यांना बाबांबद्दल अत्यंत आदर वाटे. त्यांचा बाबांवर विलक्षण विश्वास व अप्रतिम प्रेम असे. माधवरावांचें चरित्र म्हणजे बाबांच्या ठिकाणीं असलेल्या त्यांच्या भक्तीचेंच वर्णन होय. श्रीकृष्ण परमात्म विभूती देवर्षि नारद मुनींनीं ('देवर्षीणांच नारदः' श्री. भ. गी. अ. १० श्लो. २६) जी नव विधा भक्ती वर्णिली आहे त्या पैकीं माधवरावांची ही आठवी भक्ति होय

## माधवरावांची सख्य भक्ति

'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पाद सेवनं । अर्चनं वंदनं दास्यं सख्य मात्म निवेदनम् ॥

विश्वांत पसरलेल्या बाबांच्या अनंत भक्तांत श्री मद्भागवतांत वर्णिलेल्या नवविधा भक्तीपैकीं बाबांच्या भक्तांची बाबांवर निरनिराळ्या प्रकारची भक्ति असे व आहे. पण अरे तुरेची व मी तूं ची भाषा वापरून देवाशी अगदी लगट करून थट्टा विनोदयुक्त भक्ती करणाऱ्या भक्तराज अर्जुनांच्या सख्य भक्तीचा अधुनिक साधुसंताकडे कोठे नमुना पहावयाचा असेल तर तो एकटया माधवरावांच्या ठिकाणींच पाहावयास सांपडेल असं मला वाटतें.

श्री ज्ञानेश्वर माउलींना भक्तवर्य अर्जुनाच्या सख्य भक्ती बद्दल असेंच मजेदार व सुंदर वर्णन केलें आहे.

'हें असो वय सेचिये शेवटीं । जैसे एकचि विये कांझोटी ॥
'मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लगे ॥ १२१ ॥
'आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी ॥
'पिसे आणि न भुळवी । तरी तें काई ॥ १२४ ॥

' हो कां आत्म निवेदना तळींची । जे पिठीका होय सख्याची ॥
' पार्थ अधिष्ठानी तेथींची । मातृका गा ॥ १२७ ॥ श्री. ता. अ. ६

माधवराव ही बाबांच्या सख्य भक्तिच्या भूमिकेची मुख्य देवताच होते असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ते होणार नाहीं.

बाबा समाधिस्थ झाल्यानंतर माधवरावांना कांहीं दिवस चुकल्या चुकल्या सारखे वाटून कांहीं सुचेनासें होत असे.

' अवजानंति मां मूढाः । मानुषीं तनुमाश्रितम् ॥
परं भाव मजानंतः । मम भूत महेश्वरम् ॥ श्री. भ. गी. अ. श्लो.

## माधवरावांचा पश्चात्ताप

देव आपल्या सारखंच एक माणूस आहे असें समजून आपण देवास ओळखिलें नाहीं. व त्यामुळें आपण देवाशी अती सलगी केली. त्याची थट्टा मस्करी केली. त्याशी विनोद केला. देवाला अरे तुरे केले. मी तूं केले. त्याच्यावर रागावलों रुसलों. त्याच्या जवळ चांगलें चांगलें मागितलें. त्याच्याशी जोरा जोरानें भांडलों. त्याला नाना प्रकारचीं दुर्भाषणें बोललों. त्याला शहाणपण शिकवूं लागलो. तुझें आम्ही काय लागतो असें ही देवाला म्हटले. त्याच्याजवळ अशक्य कोटींतले नाना प्रकारच हट्टही केले. त्याला शपथा घातल्या व त्याच्याकडून ही घेवविल्या. त्याचेवर नानाप्रकारचे आळ घातले. तूं खोटा, खव्याळ, दुष्ट, चोर, भिकारडा, फकिरडा, थापाड्या आहेस असें म्हटले, याबद्दल माधवरावांना कधी कधी आठवण होऊन अत्यंत वाईट वाटे. व पश्चाताप होई. त्यांना रडूं कोसळे व त्यांच्या नेत्रांतून सारख्या अश्रूधारा वाहत. व त्यांनीं ते किती ही अवरण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना पुनः पुनः दुःखाचे उमाळे येत. कंठ सद्गदीत होई व अंतःकरण भरून येई. माझ्या देवासारखा सर्वव्यापी, सर्वशक्तिमान महापराक्रमी व सर्व जाणणारा असा चालतां बोलतां हंसता खेळता देव या जगांत पुनः कधी दिसणार नाहीं. कोडकौतुक व लाड पुरवावे तर माझ्याच देवानें पुरवावे. देवा मी तुला न ओळखतां जे अनंत अपराध केले ते या त्रिभुवनाच्याही पोटांत सामावणार नाहींत. पण झाल्या गोष्टीस आतां काय इलाज ! असें म्हणून ते कित्येक वेळा दुःखी होत. त्यांना हरघडी देवाच्या लडिवाळपणाची आठवण येई. व देवा तूंच या माझ्या अपराधाची क्षमा कर असें म्हणत.

भक्तराज अर्जुनाला सुद्धां ( विश्वरूपदर्शना पूर्वी ) परमात्माला देव म्हणून न ओळखतां त्याच्याशी अशीच आपण सलगी केली व त्याला आपण दुर्भाषणें बोललों व

त्याच्या जवळ भलभलते हट्ट घेतले व त्याचे अनंत अपराध केले म्हणून असाच पश्चाताप झाला. तो श्री. ज्ञानेश्वर माउलींनीं खालील प्रमाणें वर्णिला आहे.

## अर्जुनाचा पश्चाताप

' किंबहुना केवळ । सर्व तूंचि निखिळ ॥
परीक्षी रार्णवीं कल्लोळ । पयाचे जैसे ॥ ५३५ ॥
म्हणोनिया देवा । तूं वेगळा नससी सर्वां ॥
हें आलें मज सम्दावा । आतां तूं चि सर्व ॥ ५३६ ॥
परी ऐसिया तूं ते स्वामी । कांहीं च नेणोंजी आम्ही ॥
म्हणोनि सोयरे संबंध धर्मी । राहटलो तुजसी ॥ ५३७ ॥
चिंतामणीची खाणी लागली । परी नोळखेचि म्हणून आव्हेरीली ॥
तैसीं तुझी जवळीक घाडिली । सांगातीपणें ॥ ५४० ॥
तूं योगियांचें समाधि सुख । कैसा जाणेंचि ना, मी, मूर्ख ॥
उपरोध जी सन्मुख । तुजसी करूं ॥ ५४३ ॥
देवेंसी कोलकाठी धरूं । आखाडां लोंबी झोंबी करूं ॥
सारी खेळता तस्कारू । निकरें ही भांडो ॥ ५४८ ॥
पाया लागोनि बुझावणी । तुझ्या ठायीं शार्ङ्गपाणी ॥
पाहिजे ऐसी करणी ॥ बहु केली आम्ही ॥ ५४६ ॥
चांग तें उराउरी मागों । सर्व ज्ञासी बुद्धी सांगो ॥
तेवींचि म्हणों काय लागां । तुझें आम्ही ॥ ५४९ ॥
देव बोयनाच्या अवसरीं । लोभें कीर अठवण करी ॥
परी माझा निसुग गर्व अवधारी । जे फुगुनी चि बैसे ॥ ५५९ ॥
कृष्ण म्हणोनि हांकारिजे । यादवपणें तुं तें लेखिजे ॥
आपली आण घालिजे । जातां तुज ॥ ५५३ ॥
म्हणोनि काय काय आतां । निवेदिजेल अनंता ॥
मी राशी आहे समस्तां । अपराधांची ॥ ५५५ ॥
म्हणोनि त्रिभुवनीं तूं एक । तुजसारखा नाहीं आणिक ॥
तुझा महिमा अलौकिक । नेणिजे वानूं ॥ ५६६ ॥
तरी देवेंसी सलगी केली । जे विश्वरूपाची आळी घेतली ॥
ते मायबापें पुरविली । स्नेहाळाचेनी ॥ ५७९ ॥

सुरतरूंची झाडें । आंगणीं लावावीं कोडें ॥
देयावं कामधेनूचे पाडे । खेळावया ॥ ५८० ॥
मियां नक्षत्रीं डाव पाडावा । चंद्र चंडुवालिंगी आणावा ॥
हा छंद सिद्धि नेला अघवा । माउलीये तुवां ॥ ५८१ ॥
माधवरावांचा पाश्चाताप वरील भक्तराजाचे पश्चातापा प्रमाणेंच नव्हे काय ?

## माधवरावावर बाबांचा अनुग्रह.

श्री रामदासी बुवांच्या पोथ्यांतून बाबांनीं · त्यांस न कळत विष्णु सहस्रनामाची पोथी काढून घेऊन ती माधवरावांस देऊन ' श्याम्या ही रोज वाचीत जा बरं कां रे ' अशी बाबांनीं माधवरावांस आज्ञा केली. देवा माझ्या वाणीला संस्कृताचा गंध नाहीं. मला ही इष्णु सहस्र नामाची संस्कृत पोथी कशी रे वाचतां येईल ? बाबा म्हणाले ' येईल वाचतां श्याम्या जा वाचायला लाग ' माधवरावांनीं नंतर फार मेहनत करून, बाबांचे आज्ञेवर भरवसा ठेवून, चांगल्या संस्कृतज्ञ भक्तमंडळी कडून त्या पोथीची उत्तम संथा घेतली. व शुद्ध व स्पष्ट उच्चारयुक्त विष्णुसहस्रनाम मुखोद्गत केले. व बाबांचे आज्ञेप्रमाणें त्यांचें देहावसान होईपर्यंत नित्य नेमानें तें दररोज न विसरतां विष्णुसहस्रमाम म्हणत. हाच बाबांचा माधवरावांवर अनुग्रह.

## माधवरावांचा स्वभाव.

माधवराव स्वभावाचे तापट पण मनमिळाऊ, मायाळू, प्रेमी, परोपकारी, सच्छील व वेदांती निर्मळ स्वभावाचे व मुत्सद्दी. त्यांचे ठिकाणीं पुष्कळ सद्गुण सन्निपाताबरोबर कांहीं दोषही असतील. पण जगांत एका परमात्मावांचून निर्दोष व समदृष्ट असें कोणीच नाहीं.

## त्यांचे गुणदोष.

" निर्दोषंहि समंब्रह्म " ( श्री. भ. गी. अ. ५ श्लो. १९ ) तथापि एकोहि दोषो गुणसान्निपाते निमज्जतींदोः किरणे ष्विवांकः !' या कविश्रेष्ठ कालिदासोक्ति न्यायानें माधवरावांचें तेज व छाप बाबांचे सर्व भक्तांवर व इतरहि बहुजन समाजावर जी पडे त्यांचे मुख्य कारण बाबांची विशिष्ट कृपा हें तर आहेच. पण शिवाय त्यांच्या ठिकाणीं वसत असलेला अनेक गुणांचा सन्निपात हेहि आहे. चन्द्र किरणांनीं झांकलेल्या चंद्रकलंकाप्रमाणें त्यांचेहि दोष त्यांच्या अनेक गुणसमुदायांनीं झांकून गेले होते. हंसक्षीर न्यायानें माधवरावांच्या सद्गुणांतून जें काय शिकण्यासारखें असेल त्याचें ग्रहण करणें व त्यांचे दोष असतील त्याकडे दुर्लक्ष करून त्यांचा त्याग करणे हेंच प्रत्येक बाबाभक्तांस श्रेयस्कर

आहे असें मला वाटतें. माधवराव हे बाबांच्या अनुभवाचें एक अमोल व अमर्याद भांडारच होते.

## त्यांची पूज्यता.

कै॰ राधाकृष्ण आई, नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दिक्षित, तात्यासाहेब नूलकर, आण्णासाहेब दाभोळकर, म्हाळ सापती, बापूसाहेब बुटी, बाळासाहेब भाटे, अण्णा चिंचणकर, प्रभृति भक्त शार्दुलाप्रमाणें माधवरावहि मला पूज्य व वंदनीय आहेत.

## उदी दृष्टांत.

माधवरावांनीं बाबांचे हातची पवित्र उदी जवळजवळ मातीचे दोन मोठमोठे डेरे भरून काळजीपूर्वक पुण्य भावनेनें घरांतील खालचे खोलीचे कोपऱ्यांत संग्रही ठेविली होती बाबा समाधिस्त झाल्यावर त्याच डेऱ्यांतील उदी ते प्रसंगविशेषीं सर्वांना देत. ह्या डेऱ्यांत बाबांचे हातची दिव्य उदी ठेविली आहे असें घरांतील स्त्री जनाना माहीत नव्हतें. एके दिवशीं घरांतील फार दिवसाची साचलेली घाण बाहेर फेकून देण्याच्या इरादानें राखेची घाण म्हणून ते दोन डेरे बाया माणसांनीं निराळे काढून ठेवले. ही गोष्ट माधवरावांचे गैर हजेरीत झाली. माधवराव त्या वेळीं मुंबईस गेले होते. ' श्याम्या तुझ्या घरांत तूं जपून ठेवलेली माझी हातची उदी उकिरड्यावर चालली रे. जा लवकर येथून व ती नीट ठेव. ' असा माधवरावांना मुंबईस एके रात्रीं दृष्टांत झाला. माधवराव खडबडून जागे झाले व ही देवाची सूचना आहे. आजपर्यंत जपून ठेवलेलें देवाच्या कृपेचें अमोल मांडवल उकिरड्यावर जाईल असें समजून ते ताबडतोब शिरडीस परत आले व चौकशी अंतीं स्वप्नांतील गोष्ट खरी असें ठरलें. नंतर त्यांनीं ती उदी माडीवर आपल्या ताब्यांत ठेविली. ती अद्याप पावेतो त्यांचे राहते घरीं आहे

## माधवरावांना नेहमीची मदत.

वरील चरित्रावरून बाबांचे लाडके भक्त या दृष्टीनें माधवरावांची योग्यता कांहीं विलक्षणच होती असें दिसून येईल. व याच गोष्टीची जाणीव ठेवुन कै. काकासाहेब दीक्षितांनीं माधवरावावरील अतुल प्रेमाची खूण म्हणून माधवरावांना शिरडी येथील आपले वाड्यांत कांही खोल्यांत नेहमी राहण्याची परवानगी देऊन वाड्याच्या साफसुफीची व देखरेखींची कामगिरी त्यांचेवर सोंपविली होती. व स्वतःचें राहतें घर भाड्यानें देऊन माधवरावांना त्याचें जें दरमहा भाडें मिळे तीच त्यांना अप्रत्यक्ष स्वल्प मदत म्हणून करून दिली माधवराव काकासाहेबांच्या निधनानंतर त्यांचें वाड्यांतील जागेची शि. संस्थानास दरसाल भाडेचिठी बिन भोभाट करून देत.

तसेंच कै० श्रीमंत बापूसाहेब बुटीनींहि बाबांचे प्रिय भक्त या नात्यानें माधवरावांकडे, श्रीमंतांनी बांधलेल्या शिरडी येथील बाबांचे समाधि मंदिराच्या वरील सर्व भागाची साफसफाई व देखरेख करण्याची कामगिरी सोंपविली होती. या कामगिरीबद्दल मदत म्हणून बापूसाहेब माधवरावांना सात रु. दरमहा देत. बापूसाहेबांचें निधनानंतर त्यांचे व्रत त्यांच्या औदर्यशील चिरंजीवांनी माधवरावांच्या निधनापर्यंत तर चालविलेंच. पुढें काय होणें असेल तें बाबांना माहीत.

## माधवरावाशीं शि. सं. कमीटीची शेवटची वागणूक.

शिरडी संस्थान कमीटीची स्थापना शके १८४४–४५ सालीं अगर त्या सुमारास झाली. तेव्हां पासून माधवराव हे श्री दासगणू महाराजा प्रमाणें कोणत्याही प्रकारची वर्गणी न भरतां, आजीव शि. सं. कमीटीचे सन्मान्य सभासद होते. त्यांची योग्यता जाणून शि. सं. कमीटीचे सर्व सभासद त्यांना योग्य मान देऊन त्यांच्याशी चांगल्या प्रकारची वर्तणुक ठेवीत. काकासाहेब दीक्षितांचे मरणानंतर थोड्याच वर्षांनीं शिरडीतील दीक्षितवाडा, व्यवस्थेसाठीं काकासाहेबांचे चिरंजीवांनी शि. सं. कमीटीचे ताब्यांत दिला. पुढें कांही दिवसांनीं काकासाहेबांचे चिरंजीवांचे पत्रावरून ( कारण त्यांचे त्यांनाच माहीत ) शि. सं. कमीटीनें, माधवरावांचे निधनापूर्वी अवघे ४–६ महिने माधवरावांनी दोन महिन्यांत दीक्षितवाडा सोडावा म्हणून एका सभेंत ठराव केला. माधवरावही ठरावाप्रमाणें दीक्षित वाडा सोडून आपले स्वतःचे घरीं रहावयास गेले. कमीटीनें घाई करून माधवरावासारख्या बाबांच्या प्रिय व सच्छील भक्ताबद्दल थोडक्याकरतां हा जो ठराव केला तो खरोखरच, कमीटीच्या आजपर्यंतच्या मोठेपणास, इभ्रतीस व लौकिकास शोभेसा नव्हता असें मोठ्या कष्टानें व दिलगिरीनें म्हणावें लागतें. बाबांच्या दरबारांतील माधवरावांच्या भूमिकेची म्हणजे आठव्या भक्तीस्थानाची आठवण न झाल्यामुळें हा प्रकार घडला व माधवरावांचें मन थोडक्याकरता दुखावलें गेलें असें मला वाटतें. असो. बाबांचीच इच्छा अशी दिसते कीं आपल्या लाडक्या भक्तानें आपला देह आपले स्वतःचेच घरांत ठेवावा. व त्याप्रमाणें माधवरावांनी आपला देह, काकासाहेब दीक्षित, भाऊ साहेब धुमाळ, आण्णा साहेब दाभोळकर या पुण्य भक्तां प्रमाणें कोणत्याही प्रकारचे कष्ट न सोसावे लागतां फक्त एक अहोरात्र व दुसरे दिवशीं रात्री १२ वाजेपर्यंत बेशुद्ध स्थितीत राहून आपले स्वतःचे वास्तूंत शके १८६२ चैत्र कृ. ४ गुरुवार दिनांक २६ एप्रिल सन १९४० या पुण्य दिवशीं रात्रीं श्री साइसद्गुरु माउलीचे दिव्यचरणीं ठेविला. त्यावेळीं त्यांचें वय ८० वर्षांचें होतें. अशा तऱ्हेचा मृत्यु क्वचितच कोणास लाभत असेल. पूर्व सुकृतावाचून व पूर्ण गुरुकृपेवाचून असा मृत्यु

लाभणें कठीण. माधवरावांची निधन यात्रा दुसरे दिवशीं सकाळीं मोठ्या थाटानें निघाली. यात्रेस पुष्कळ गर्दी झाली होती. त्यांना पुष्कळ मंडळींनी सार्वजनिक मोठ्या बिंदिरीवर आदरानें व प्रेमानें तिलांजली दिली. व नंतर मंडळी आपापल्या घरी गेली.

## माधवरावांचा मोठा फोटो.

माधवरावासारख्या बाबांच्या अत्यंत प्रिय भक्ताचा फोटो बाबांच्या समाधि मंदिरांत असणें अत्यंत अवश्य आहे असें मला वाटते माधवरावांचे लहान फोटो पुष्कळ आहेत. पण त्यांचा मोठा फोटो माझे पाहण्यांत नाहीं. त्यांच्या मोठ्या फोटोस १०ते१५रु. पर्यंत खर्च येईल असा माझा अजमास आहे. माधवरावांच्या तिन्ही चिरंजीवा पैकीं कोणीही त्याचा विस्तृत (enlarged) फोटो पदर खर्चानें शि.संस्थानास देतील असें वाटत नाहीं. तथापि त्यांचेजवळ चौकशी करून पहावी. त्यांनी न दिल्यास किंवा देण्याची असमर्थता दर्शविल्यास शि. सं. कमीटीनें संस्थान खर्चानेंही व्यवस्था करावी. अशी माझी नम्र सूचना आहे. माधवरावासारखा सख्य भक्तीचा पुतळा भविष्यकाळीं कोणास पाहण्यासही क्वचितच मिळेल.

## प्रार्थना

प्रत्यक्ष सांगितलेल्या माहितीवरून अधुनिक सख्य भक्ति नायक भक्तांचें स्वल्पचरित्र अल्पबुद्धीनें लिहिण्याची ज्या जगन्नायक सद्गुरु साइ माउलीनें प्रेरणा केली तिच्याच पुण्यपवित्र दिव्यचरणीं हें एकोन त्रिंशति दलाचें वाङ्नीलोत्पल अनन्यभावें समर्पण करून अशीच सेवा निरंतर सेवकाकडून घेण्याची तिलाच नम्र प्रार्थना करून मजजवळ असलेले माधवरावांचें आणखी अनुभव पुढें यथावसर प्रसिद्ध करीन असें सहृदय भक्त वाचकांस नम्रपणें सांगून त्यांची रजा घेतो.

## श्याम माधवरावांना वंदन.

### स्रग्धरा.

प्रख्याता पार्थभक्ती, हरिचरणिं जशी, आठवी सख्य साची ॥
तैसीची सख्य भक्ती, शिरडी सुरपदीं, श्यामया माधवाची ॥
त्या शामा माधवांच्या, शुचि पदकमलीं, मस्तका सत्प्रभावें ॥
ठेवूनी बाल वंदी, नत विमल मनें, आदरें प्रेमभावें ॥

ठाणें गुरुवार भाद्रपद शु. ४
शके १८६२
दिनांक ५–९–४०

संतपद रजदासानुदास
बालकृष्ण विश्वनाथ देव.

## वांद्रे येथे श्रीसाईबाबांच्या

# पुण्यतिथीचा उत्सव

—:o:—

सालाबादप्रमाणे यंदाही श्री सद्‌गुरू साई बाबांच्या पुण्यतिथीचा उत्सव अश्विन शु॥ १० गुरुवार शके १८६२ रोजी रावसाहेब यशवंत जनार्दन गाळवणकर यांचे घरीं वांद्रे येथें साजरा करण्यांत आला. त्या दिवशीं सकाळीं श्रीसद्‌गुरू माऊलीची महापूजा व महानैवेद्य होऊन रात्रौ नऊ ते एक वाजेपर्यंत ह. भ. प. विष्णु कृष्ण उपाध्ये उर्फ निजामपूरकर यांचें सुश्राव्य कीर्तन झाले. किर्तनाचा विषय मनुष्य मात्राचे आयुष्याचे ध्येय काय असावे व पारमार्थिक ध्येय म्हणजे काय व ते ध्येय प्राप्त होण्यासाठीं श्रीसद्‌गुरूची जरूरी कशी असतें हा होता व उत्तररंगांत महाभक्त श्रीअंबरीष यांचे पुण्य चरित्र लाविले होते. कीर्तन मोठे प्रेममय झाले. बरीच स्त्री व पुरुष श्रोते मंडळी मोठ्या आवडीनें आली होती. कीर्तनाचे शेवटीं प्रसाद व कॉफी पान होऊन उत्सव समाप्त झाला. असाच व ह्याहूनही द्विगुणित असा श्री सद्‌गुरू माऊलीचा उत्सव अतिशय भक्तीनें व प्रेमानें सालोसाल व्हावा अशी सद्‌गुरूचे चरणापाशी प्रार्थना आहे. ह्या पुण्य दिवशीं यंदा आणखी विशेष सुयोग असा आला कीं सकाळीं सवा नऊ ते सवा दहाचे दरम्यान "श्री साई प्रासाद" नांवाचे नवीन गृहाच्या पायाची शिला पूजा होऊन कोनाईला बसविण्यात आली व तदनंतर हजर असलेल्या मंडळीस श्री साई बाबांचा प्रसाद वाटण्यांत आला. ह्या 'श्री साई प्रासादा'मध्यें श्री सद्‌गुरू माऊलीच्या कृपा प्रसादानें अखंड भक्ती सुखाचा सोहळा सर्वांस भोगावयास मिळावा अशी श्री सद्‌गुरूचे पायापाशीं प्रेमाची प्रार्थना आहे.

श्री. साईभक्त

य. ज. गाळवणकर

## —श्री साई-मल्लिनाथ समर्थाष्टक—

### —स्रग्धरा—

द्रा-ऊनी- प्रेम मोठें सफलहि करिसी पूर्ण त्याच्या मनीषा ॥
जी-जी इच्छा धरावी, पुरविसि तिजला, योग्य काळीं सुरेशा ॥
वि-श्वाचा विश्व तूंची, असुनिहि तुजला, मानितीं लोक दृष्टीं ॥
ठ्ठ-कोनी लोक सारे, स्वहित विसरतां, अंतिं होतील कष्टी ॥
ल-क्ष्मी जो सर्व साक्षीं, विधि, हरि, हरतो राम, अल्ला इलाही ॥
सां-गावें यांत काय, त्रिभुवन भरुनी, साइ अल्ला इलाही ॥
बा-बा,बाबा, सदाही जपतचि असतां काळ धाके थरारा ॥
रे-त्यांच्या पुण्य पारा, नसुनि विफल तो, विश्वरूपी पसारा ॥

प्रेमें या अष्टकासी, नमुनि गुरुवरा, प्रार्थितो मी सदाही ॥
लाहो सप्रेम भक्ती, कुमति नच शिवो, मल्लिनाथा कदाही ॥ १॥



श्री साई बाबा

## श्रीसाई भक्तवृंदांस पुन्हा एकवार अत्यंत कळकळीची व

# विनम्र विनंती

गेले सालचे ( शके १८६१ चे ) लीलेचे जोड अंक १-२-३ मध्ये मूळचा साठे-वाडा व हल्लीचा नवलकर वाडा पडीक स्थितींत संस्थानास नवलकरांचे बंधूनकडुन देणगी दाखल आलेचे व त्याचे बांधणीसाठी मदतीची भक्तवृंदांस जाहीर विनंती केलेली आहेच. सदर वाड्याचे बांधणी काम भक्तांस उतरणेचे सोईचे दृष्टीनें किती जरुरीचें आहे याची पूर्ण जाणीव होऊन सन्माननिय भक्तवर्य रा. रा. नागेशराव आत्माराम सावंत पोलीस सब इन्स्पेक्टर, मुंबई शहर, बाबांचे एक जुने भक्त, व त्यांचे व्यवसाय बंधू रा. रा. भास्कर सदाशिव साटम, बाबानी नवीन आकर्षण केले भक्त, या उभयतानीं प्रत्येकीं अनुक्रमे रु. १०१ व रु. ५०१ गेले पुण्यतिथीचे उत्सवास श्रीचे दर्शनास शिरडीत असलेवेळी देणग्या देऊन व्यक्त केली आहे.

संस्थानकडुन केलें गेलेले विनंतीस आजपर्यंत फक्त अजमासे रु. ५०० वसुली आलेली आहे. व ती कामाचे अंदाजी १०।१२ हजाराचे खर्चाचे मानानें अगदींच अपुरी आहे. ही रक्कम म्हणजे रंगुनचे डॉ. जी. पी. देसाई यांचेकडुन दोन वेळ आलेली रु. १०० ची देणगी व इतर किरकोळ मद्रासचे भक्तांकडुनच आलेली वसुलीची आहे. यांतच नेलोरचे राजगोपाळचारी डॉक्टर समक्ष गेले पु. ति. उत्सवास शिरडींत हजर होते व ज्यांना या कामाची पूर्ण जाणीव होऊन नेलोर येथें परत जातांच आपण या कामा-करितां वर्गणी गोळा करणेचे आगत्याने करुं असें ज्यांनी अभिवचन दिलें त्यांचेकडुन नुकतीच रु. १०२ ची वसुली तिचाही समावेश होतो.

तरी पुन्हां एकवार पुण्यशील, परोपकारी, उदारचरित व ज्यांस बाबानी आर्थिक सुस्थितींत ठेविलें आहे अशा भक्त वृंदांस या कामीं त्वरित मदत करुन श्रीचे द्वारीं येणारे भक्तांची उतरणेची गैरसोय दूर करणेचे पुण्य सेवेचे यश संपादन करणेविषयीं ही विनंती आहे.

| | |
|---|---|
| कार्तिक शु. १५ गुरुवार,<br>शके १८६२, दिनांक १४।१०।४०<br>३७, चरई रोड, ठाणें. | श्री. ना. खारकर<br>ऑ. चिटणीस<br>शिरडी संस्थान |

# शिरडीवृत्त

## सप्टेंबर १९४०

या महिन्यांत रावसाहेब मामलेदार व मुनसफ कोपरगांव महाराष्ट्र शुगर फॅक्टरींचे मॅनेजर व बंगाल, मद्रास, हैदराबाद व महाराष्ट्रांतील पुणें, मुंबई व रेवदंडा या गांवचे बाबांचे भक्त व पाहुणे मंडळी श्रींचे समाधीचे दर्शनास येऊन गेली. श्री. नरसिंह-स्वामी, मद्रास हे हल्लीं येथें आलेले असोन त्यांचा तूर्त महिनाभर येथें मुक्काम करणेचा इरादा आहे.

## देणग्या

या महिन्यांत आलेल्या भक्तांकडून कोठी, कायम फंड वगैरे संस्थानचे फंडास लहान सहान आर्थिक देणग्या आलेल्या आहेत. त्या संस्थानांत पावत्या बरहुकूम जमा आहेत. शिवाय श्री. कुसाई केशव खांबकर, मु. अंधेरी यांचेकडून एक फितेचा हिरवा गलेफ श्रीस अर्पण म्हणून आलेला आहे.

## धर्मकृत्यें

श्रींचे समाधीस अभिषेक, आर्चने, पूजा, नैवेद्य व सोमवार गुरुवारादि वारांचे नैमित्यीक अभिषेक सारखे चालूच आहेत व या धर्मकृत्यांत प्रामुख्यानें मद्रास बाजूचे भक्तांचाच जास्त भरणा होता. संस्थान चिटणीस श्री. खारकर यांनी एकादशीस गुळ-शेंगदाण्याचा प्रसाद वाटला.

## कीर्तनें

श्रींचे मंदिरांत भा. शु. ४ व ११ व भा. व. ११ अशी तीन कीर्तनें संस्थान खर्चाची झाली.

## हवापाणी

उत्तम होते.

## आक्टोबर १९४०

या महिन्यांत श्रींचे पुण्यतिथीचा उत्सव असलेमुळें संस्थान कमिटीचे व कार्यवाहक मंडळाचे बहुतेक सभासद व मद्रास, नेलोर, धर्मवरम, शिकंदराबाद वगैरे बाहेर प्रांतांतील सन्माननीय भक्तवर्य यांचा शिरडींत फारच मोठा मेळा श्रींचे दर्शनास हजर होता. श्रीसाईलीला मासिकाचे गेले ( आश्विन अंक ७ ) मध्यें ज्या बालसंन्याशांचे माहितीच संडे टाईम्स, मद्रासचे ता. २९ सप्टेंबरचे अंकांतील लेखाचा अनुवाद प्रसिद्ध झाला आहे ते बालयोगी व त्यांचे पालक मि. डंकन ग्रीनलीज साहेब मद्रासचे गुरुकुलाचे प्रिन्सीपाल हे उभयतां उत्सवाचे अगोदर दोन तीन दिवस श्रींचे दर्शनास येऊन गेले. ( मि. डंकन ग्रीनलीज यानीं या दिलेले भेटीचे वेळीं दिलेला इंग्रजी शेरा सोबत छापिला आहे त्यावरुन त्यांचे आगमनाचा खुलासा होईलच. )

## देणग्या

कोठीफंड, कायमफंड, लेंडीबाग, धुनी राहणेचे सोईकरितां वसतीगृह वगैरे कार्यास आर्थिक देणग्या आलेल्या पावत्या बरहुकूम जमा आहेतच. श्री. ना. आ. सावंत, सब-इन्स्पेक्टर, मुंबई यानी रु. १००१ ची व श्री. भा. स. साटम सब इन्स्पेक्टर, मुंबई यानी रु. ५०१ ची अशा दोन देणग्या बिल्डिंग फंडास देऊ करुन सं. चिटणीस यांस रकमा लवकर ताब्यांत घेणेस बजाविलें. शिवाय मद्रास भक्तांकडून कौटुंबिक उपयुक्ततेचें औषधांच्या चार पेट्यांची देणगी भक्तांचे उपयोगाकरितां म्हणून आलेली आहे. वस्तूही कांही देणगीरुपानें आलेल्या आहेत पैकीं कांही पुढीलप्रमाणें आहेत.

श्री. ना. आ. सावंत, १ जरीकाठी उपरणें, श्री. भा. स. साटम, १ जरीकाठी पितांबर, सौ. रुक्मीणीबाई वि. दळवी, १ जरीकाठी पितांबर, श्री. आनंदअम्मल १ कानतोळे २११ मणी २ चांदीचे, श्री. एस. वी. केशव १ धोतर, श्री. गो. का. गाडगीळ, २ वार हिरवे कापड, गोविंदप्पा १ उपरणें रेशमी, श्री. रामचंद्र सांबशिव १ गलके

हिरवा, डॉ. राजगोपालाचारी १ गलेफ हिरवे शारीनचा झाँग नक्षी काम केलेला, श्री. एम. टी. संपथकुमार १ उत्तम तऱ्हेची फीत लावलेली मच्छरदाणी, श्री. बाबूशेट मारवाडी १ रेशीम काठी उपरणें, शेट जहागीरजी पारशी मु. मुंबई यांचेकडून बाबांचा ब्रांझ धातूचा पुतळा रु. ३००० किंमतीचा संस्थानास देणगी दाखल येणार असलेचें जाहीर झालें

## धर्मकृत्यें

अभिषेक, पूजा, आर्चने व नैवेद्य वगैरे धर्मकृत्यें नेहमी प्रमाणेंच या महिन्यांत झाले. त्यांतले त्यांत नमूद करणें सारखी म्हणजे श्री. रामचंद्र सांवशिव म्हैसकर वकील, निझामस्टेट, यांचे अन्नदान, श्री. एम. रंगप्पा संजिवाप्पा, अडोनीं, यांचा लघुरुद्र, पंच पक्वान्नाचा महानैवेद्य, ब्राम्हण भोजन व संस्थानचा एक दिवसाचा खर्च देणगी, भक्तांचें मार्फत शाळेचे मुलांस रव्याचे लाडू व शंभर पानाचे अन्नदान, श्री. दादाजी गोपीनाथ यांची सत्यनारायण पूजा, लघुरुद्र, ( श्रीशनी देवास १ व श्रीचे समाधीस एक ) नैवेद्य व १०० पानांचें प्रसाद भोजन, व कांहीं भक्तांचे दुधाचे आभिषेक शिऱ्याचे नैवेद्य व तेल तुपाचे नंदादीप गरीबांस कोरडे अन्न, दुध, चिल्लर वगैरे अर्पण.

## नवल विशेष

पुण्यतिथी उत्सव ( अहवाल आलाहिदा येईलच ) ता. १० गुरवार ते ता. १४।१०।४० सोमवार गोपालकाला समाप्त होऊन ता. १५।१०।४० रोजी कोजागिरी पूजा झाली.

सरस्वतीपूजन दसऱ्याचें दिवशीं वाचनालयांत झालें. प्रसाद पेढ्याचा श्रीयुत खारकर सं. चि. यांनी वाटला. भिक्षेचा कार्यक्रम दोन दिवस झाला. व रथाची व पालखीची मिरवणूक झाली.

सं. गवयाची ५ व श्री. बाळासाहेब देव यांचे एक अशी कीर्तनें झाली.

कोजागरीचे रात्रीं कीर्तन, पूजा, पोथी, दुध वाटणें व सोंकटया खेळणें झाले.

त्यानंतर एक दिवस गावकऱ्यांस शिरा कढी भात भोजन झाले. इतर पांच दिवस पाहुणे मंडळी, संस्थान नोकर, सेवेकरी व निमंत्रित गावांतील मंडळी यांस श्रीचे मंदिरांत व एक दिवस लेंडी बागेत भोजनें देणेंत आली. भंडारा भोजन ( शिधा ) झाले त्याचा खर्च सौ. बहिनीबाई गाडगीळ यांनीं दिला.

उत्सवांत श्री. सौ. इंदुमती व्ही. चौबळ, दादर, व. श्री. गंगाधर विष्णु शेव- नागर ( तारमास्तर ) यांची श्रींचें पुढें गायनांची हाजिरी झाली.

श्री. सौ. जानकीबाई देव यांनीं शिर्डीतील स्त्रीयांस लेंडी बागेंत पिठले भाकरीचे भोजन दिले.

श्री. बाळासाबू मद्रास, यांचे एक दिवस मंदिरांत तेलगू भाषेंत प्रवचन झाले.

श्री. नरसिंहस्वामी यानीं शिर्डी येथील मारुतीचे देवळाजवळ अश्वथ्य वृक्षाखालीं नागस्थापना ता. २८–१०–४० रोजीं यथाविधी केली.

ता. ३०–१०–४० रोजीं मंदिरांत श्री. नरसिंहस्वामींचे हस्ते श्री. लक्ष्मीपूजन थाटाचे झालें. शोभेचे दारूकाम लाविले. नर्कचतुर्थीचे दिवशीं पहाटे श्रींचे समाधीस अभ्यंग स्नान, दिव्याची रोषनाई झाली. पाडव्याचे दिवशीं रात्रौ ह. भ. प. विश्रामबुवा यांचें कीर्तन झालें.

आश्विन व. ११ स सं. गवयाचे कीर्तन झालें.

लेंडीबागेंत बरेच दिवसापर्वी लावलेले नारळींचे झाडांस यंदा नारळ आले आहेत.

## हवापाणी

उत्तम होते.

श्री. ना. खारकर
ऑ. चि.

# Opinions of the Visitors to the Shrine of Shri Sai Baba.

( Copied from 'The Visitors' Remarks Book' )

I visited the Shri Holy Sansthan of Shri Sai Baba. It was my fortune to be present at a time when people even from Madras came to attend the festival Shri Guru Purnima.

The management is trying to do best as is possible to be kept in a distant place, as fairly as can be possible to meet requirements of the Visitors. The ornaments & other things are maintained properly. My prayer to Shri Sai Baba that he should bless us all to be of humble service to Him and through Him to the general body of His Bhaktas.

Bow to Him.

( *sd.* ) **B. V. Warerkar.**

Date 20-7-40 C. E, T. D. G, G. D. A., R. A.

( 2 )

Since installing His picture in The Shrine at Shri Sai Bal Gurukul, Royapetah, Madras, a visit to this holy place has become inevitable. Yet when we started on our pilgrimage to Pandharpur & Nasik we have no idea of then visiting it. Shri Sai Baba has arranged this & has given our little party a blessed day. His bhaklas here do all they can in His Service.

( *sd.* ) **Duncan greenleas.**

Date 6-10-40.

# अनुभव

श्रीयुत रामदास रामचंद्र स्वामी व्हेटरनरी सर्जन, मु. मन्नरगुडी, एस. आय. रेल्वे, हे संस्थान चिटणीसांस कळवितात कीं आपलेकडून पुण्यतिथी उत्सवाचा प्रसाद आला त्याबद्दल आम्हीं आपलें फार आभारी आहोंत. हा प्रसाद हातीं मिळणेचें अगोदर उजाडतांच स्वप्न पडलें कीं टपालचा शिपाई एक पाकीट घेऊन आला आहे व सांगत आहे कीं साईबाबांचे उदी प्रसादास पोष्टेज दिलें आहे किंवा नाहीं हे आम्ही बघत नाहीं. त्याचा उलगडा असा आहे कीं मी पुण्यतिथीचे उत्सवास देणगी पाठविणेचें बरेंच दिवस योजीत होतो परन्तु मजकडून ते घडले नाहीं तेव्हां बाबानींच हा दृष्टांत दिला कीं वर्गणी पाठविली तरच भक्तांस प्रसाद मिळतो असं नाहीं व त्याप्रमाणें अगाऊ स्वप्नांत जाणीव देऊन लागलाच पोष्टानें प्रसाद हातीं दिला. ही लीला बाबांचीच आहे अशी माझी पूर्ण खात्री होऊन रु. २ दोनची बाबांचे चरणी अर्पण होणेस मनीऑर्डर करीत आहे. ( स्वदस्तूरचे पत्रावरून ) S. N. K.

## श्रीयुत भास्कर सदाशिव साटम, सब इन्स्पेक्टर ऑफ पोलीस लॅमिंग्टन रोड, पो. स्टे. सी. डिव्हीजन, मुम्बई यांचा अनुभवः—

आपण पोलीस खात्यांत सन १९११ साली नोकरीस लागलों व सबइन्स्पेक्टरचे
हुद्यास चढलो. सन १९३० चे सुमारास आपली व श्रीयुत नागेश आत्माराम सावंत
यांची भेट झाली व त्यांनीं मला ते वेळीं श्रीसाईबाबांचे विषयीं माहिती सांगितली व
तेचवेळी मी शिरडीस दर्शनास जाईन म्हणून त्यांस म्हटलें. परन्तु वर्षानुवर्षे लोटली
परन्तु माझे जाणें झाले नाही. सन १९४० साली आम्ही दोघेहि नायगांव पोलीस
ट्रेनिंग स्कूलवर असतां मजवर संकट येऊन ता. १६–२–४० ला मी नोकरीवरून

सस्पेंड झालों. या संकटांत असतां मी बाबांची प्रार्थना केली व शिरडीहून उदी प्रसाद व फोटो मागविला. उदी प्रसाद व फोटो पाठविणारानें पाठविला असतां फोटो मात्र हातीं आला नाहीं. त्या नंतर मला डिसमिसलचा हुकूम ता. २८–३–४० ला मिळाला. सावंतांचे सांगणेत आलें कीं मी समक्ष शिरडीस दर्शनास जावें. मी व माझा मुलगा रामनवमीचे उत्सवांत शिरडीस दर्शनास गेलों व दोन दिवस तेथें राहून परत गेलों. परत जातांना मला दादर स्टेशनवर एक पोलीस शिपाई भेटला व त्यानें मला सांगितलें की तुम्हाला परत नोकरीवर घेतलें आहे व तुमची नेमणूक लॅमिंग्टन रोड पो. स्टेशनला झाली आहे. खरोखर असा हुकूम त्यावेळीं होणें शक्यच नव्हते कारण आपण अपील अर्ज सुद्धी पुढें ता. २८–४–४० ला केला. पण मजा कीं ता. १४–५–४० ला माझे अपील अर्जावर हुकूम झाला कीं तुम्हाला पुनः नोकरीवर घेतलें आहे व नेमणूक लॅमिंग्टन रोडला केली आहे. तेव्हां हाच हुकूम बाबांनीं मला दोन महिने अगाऊ शिपायामार्फत कळविला होता. केवढी ती आघाद शक्ति व काय त्या सद्‌गुरुरायाचा महिमा !

त्याचप्रमाणें मी आर्थिक अडचणींत होतो व त्याचें निवारणार्थ मी बाबांची प्रार्थना केली व त्या माऊलीनें त्याही बाबतीत मला मदत दिली व आज मी त्यांचेच कृपेनें सुस्थितीत व आनंदात आहे.

( साईसुधाचे नवंबरचे अंकावरून ) S. N. K.

# श्रीसाइनाथ ट्रेडिंग कंपनी

## सुगंधी सामानांचा कारखाना.

प्रोप्रायटर—व्ही. जी. देशपांडे,

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर.

*　　　*

आमचे कारखान्यांत शास्त्रोक्त बनविलेलीं सुवासिक तेलें, सर्व तऱ्हेची टूथ पावडर, सर्व प्रकारच्या सुगंधी उदबत्त्या, पुष्पगंधा व मधूमालती व गुलकंद.


---

## List of books about Shri Sai Baba.

or Krishnna Datta Marutiadi Roopa Sai and silver & gold lockets in different sizes write to the clerk, Shirdi Sansthan, Post Rahata Dt: Ahamednagar or write to :—

[1] R. Aanchinathon 30, N. V. Chetty street,
Triplicane, Madras

or

[2] Shri thirupurasundari Jewellory 531, Pyerofts Road,
Triplicane, Madras.

For Madras books & shirdi Guide write to the clark. Shirdi Sansthan, at Shirdi P. O. Rahata Dt: Ahmednagar.

Madras books available at Sai Samsthan, Shirdi. P. O. Rahata Dist. Ahamednagar.

For Gujarathi:—

"Guru Smriti," "Manache Shloka" "& Hari Path" write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira:

For Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile-Parle.

**For Authentic Photos of Sai Baba:—**

write to Mr. R. V. Ghaisas, Editor Sailila, Dadar. (sizes available card, cabinet, little bigger and bigger enlargement.)

As.

**For Guide to Shirdi in English:—**

write to the clerk, Shirdi Sansthan, at Shirdi, Post Rahata, Dist. Ahmednagar

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to—Editor Sai Lila, GokhaleRoad (North), Dadar, Bombay 14.


छातीचे विकारांवर
सांडू ब्रदर्स यांचे
हार्टिना
Regd.
(HEARTINA)

**HEARTINA**
Excellent Heart Tonic

छातींत कळा येणें, सुई टोंचल्या सारखं वाटणें, छातींत घबराट होणें, फुफ्फुस विकार, High Blood Pressure इत्यादि विकारांवर रामबाण.

वा. किं. रु. ३ (ट. ख. नि.)
सविस्तर माहिती साठीं लिहा:—
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर. लि.
आयौंषधि कारखाना.
चेंबूर--मुंबई.


सूचना:—कोणास जाहिराती देणे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.
रामचंद्र वासुदेव घैसास लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २, गोखलेरोड नॉर्थ, दादर

Printed at Calendar Press, Dadar and Published by R.V. Ghaisas-Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg. No.2, Gokhale Rd. North, Dadar, Bombay 14